१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, शुक्रवार १ मे, २०२६ • वर्ष-१०४, अंक-५७, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 57 Marathi - Daily - Mumbai, 1 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

navakal.in

प्रहारची तोफ आता थेट धनुष्यबाण चालवणार!

@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews

## थोडक्यात...

### बारावीच्या परीक्षेचा निकाल शनिवारी जाहीर होणार

**मुंबई** - राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या बारावी परीक्षेचा निकाल २ मे रोजी शनिवारी लागणार आहे. यादिवशी निकालाबाबत मंडळाकडून सकाळी ११ वाजता पत्रकार परिषद होणार आहे, तर दुपारी १ वाजल्यापासून विद्यार्थ्यांना बोर्डाच्या संकेतस्थळावर निकाल ऑनलाईन पाहता येणार असल्याची माहिती बोर्डाचे अध्यक्ष त्रिभुवन कुलकर्णी यांनी दिली.

### आसाराम याचा जामीन सुरूच २५ मेपर्यंत मुदतवाढ दिली

**जोधपूर** - लैंगिक अत्याचाराच्या दोन प्रकरणांत जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला स्वयंघोषित धर्मगुरू आसाराम याला वैद्यकीय कारणास्तव दिलेला अंतरिम जामीन राजस्थान उच्च न्यायालयाने बुधवारी २५ मेपर्यंत वाढवला. न्या. संजीव प्रकाश शर्मा आणि न्या. संगीता शर्मा यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. आसाराम याच्या वकिलांनी न्यायालयात सांगितले की, ८६ वर्षीय आसाराम याच्यावर अद्याप उपचार सुरू असून तो पूर्णपणे बरा झालेला नाही. आसाराम याच्या प्रकृतीची दखल घेत खंडपीठाने अर्ज मंजूर करत अंतरिम जामिनाची मुदत २५ मेपर्यंत वाढवली.

### सीईटीच्या दुसऱ्या संधीच्या परीक्षांच्या तारखा जाहीर

**मुंबई** - राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सीईटी परीक्षेच्या दुसऱ्या संधीच्या तारखा जाहीर केल्या आहेत. आता ही परीक्षा ९ ते २१ मे यादरम्यान होणार आहे.ही प्रवेश परीक्षा दिल्यानंतरच विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळतो. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन,मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, कृषी शिक्षण या अभ्यासक्रमांसाठी सीईटी परीक्षा जाहीर झाली आहे. ही परीक्षा ९ मे ते २१ मे या कालावधीत होणार आहे.

# विधानपरिषद आमदारकीसाठी बच्चू कडू शिंदे पक्षात दाखल

# नीलम गोऱ्हेंच्या उमेदवारीने नाराजी! मविआत धुसफूस

**विधान परिषदेच्या रिक्त झालेल्या नऊ जागांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी अनेक नाट्यपूर्ण घडामोडी घडल्या आणि अखेर ही निवडणूक बिनविरोध झाली. बिनधास्त-बेधडक नेता अशी ओळख असलेले बच्चू कडू यांनी आपल्या प्रहार संघटनेला दूर ठेवत विधानपरिषद आमदारकी मिळवण्यासाठी शिंदेसेनेत प्रवेश केला. शिंदेसेनेने आपला दुसरा उमेदवार म्हणून नीलम गोऱ्हे यांच्या नावाची घोषणा करताच पक्षात नाराजीचे सूर उमटले. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने आपल्या कोट्यातील एकमेव जागेसाठी अमोल मिटकरींना टाळून मयत बाबा सिद्दिकी यांचे पुत्र झिशान सिद्दिकी यांना उमेदवारी दिली.त्यामुळे मिटकरी नाराज झाले. तर शेवटच्या तासापर्यंत धुसफूस सुरू असलेल्या महाविकास आघाडीत कशीबशी दिलजमाई झाली. काँग्रेसने शेवटच्या क्षणी माघार घेत शिवसेना उबाठाचे अंबादास दानवे यांच्या उमेदवारीला पाठिंबा दर्शविला. त्याचबरोबर दानवे यांना पाडण्याचा प्रयत्न करण्यासाठी भाजपानेही सहावा उमेदवार दिला नाही. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध होणार आहे.**





■ मुंबई

**विधान** परिषदेवरील नऊ जागांपैकी महायुतीतील संख्याबळानुसार भाजपाला सर्वाधिक पाच जागा, शिंदेंच्या शिवसेनेला दोन आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला एक जागा आणि मविआला एक जागा मिळाली आहे. त्यानुसार भाजपाने आपल्या पाच उमेदवारांची यादी २८ एप्रिल रोजीच जाहीर केली. सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे आणि प्रमोद जठार हे पाच उमेदवार नियमित निवडणुकीसाठी तर प्रज्ञा सातव यांना पोट निवडणुकीसाठी भाजपाने उमेदवारी दिली. राष्ट्रवादी अजित पवार गटातून झिशान सिद्दिकी यांचे नाव कालच निश्चित करण्यात आले होते. आज त्यांनी उमेदवारी अर्ज भरला. शिंदेंच्या शिवसेनेतून कोणा कोणाला संधी मिळणार हे आज दुपारपर्यंत गुलदस्त्यात ठेवण्यात आले होते. मात्र बच्चू कडू यांना पक्ष विलीन करण्याच्या अटीवर शिंदेसेनेतून उमेदवारीची ऑफर देण्यात आल्याचे वृत्त कालच आले होते. परंतु बच्चू कडू आणि एकनाथ शिंदे यांची काल भेट झाली नव्हती. आज बच्चू कडू यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यानंतर शिंदेंच्या उपस्थितीत कडूंनी शिंदेसेनेत जाहीरपणे प्रवेश केला. शिंदेसेनेच्या प्राथमिक सदस्यत्वाचा अर्ज भरून कडू यांनी शिंदे यांच्या हाती दिला. याप्रसंगी बच्चू कडू यांनी आपण शेतकरी,मजूर, दिव्यांग आणि वंचितांच्या कल्याणासाठी शिंदेसेनेत प्रवेश करत असल्याचे सांगितले. त्याचवेळी त्यांची प्रहार सामाजिक संघटना आणि प्रहार दिव्यांग संघटना या पूर्वीप्रमाणे समाजाच्या कल्याणासाठी पूर्वीच्याच तडफेने स्वतंत्रपणे काम करत राहतील असे

पान ७ वर

### निवडून येण्याची क्षमता संपली बच्चू कडूंवर राऊतांची टीका

बच्चू कडू यांनी शिंदेसेनेत अधिकृतपणे प्रवेश करताच उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी कडूंवर हल्ला चढवला. विधान परिषदेच्या आमदारकीसाठी बच्चू कडू यांनी आपला पक्षच शिंदेसेनेत विलीन केला याचा अर्थ निवडणूक लढून विधान सभेवर निवडून येण्याची कडू यांची क्षमता संपुष्टात आली, असे राऊत म्हणाले. याच बच्चू कडू यांना उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री असताना आपल्या सरकारमध्ये मंत्रिपद दिले होते. पण आता काय बोलणार, असे म्हणत राऊत यांनी कडूंच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली.

## पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण आणखी वाढवण्यासाठी नियमांत बदल करणार




**पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्यावरून केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग खात्याचे मंत्री नितीन गडकरी यांच्यावर आरोप होत असताना आता पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण आणखी वाढवण्यासाठी आणि पर्यायी इंधनाचा वापर करण्यासाठी मोटर वाहनविषयक प्रदुषणाच्या नियमांमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने मांडला आहे. त्यानुसार पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याचे २० टक्के प्रमाण ८५ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात येणार आहे.**

■ नवी दिल्ली

**भारतात** सध्या जी पंधरा वर्षांच्या आतील वाहने वापरात आहेत त्यांचे इंजिन इथेनॉल मिश्रित पेट्रोलच्या वापरास सुसंगत नाहीत. त्यामुळे पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्यास वाहनधारकांकडून विरोध झाला होता. देशात निर्मिती केल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे इंजिन इथेनॉल मिश्रित पेट्रोलच्या वापरास सुसंगत झाल्यानंतर म्हणजे २०३० इथेनॉलच्या धोरणाची अंमलबजावणी करायची अशी मूळ कल्पना होती. मात्र त्याआधीच सरकारने धोरणाची अंमलबजावणी सुरू केली. प्रथम पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण टक्के ठेवण्यात आले होते. कालांतराने त्यात वाढ करत सरकारने पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण २० टक्क्यांपर्यंत वाढवले आहे. मंत्री नितीन गडकरी यांचे दोन मुलगे इथेनॉल निर्मितीच्या उद्योगात आहेत. त्यावरून वैयक्तिक स्वार्थासाठी गडकरी पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याचे धोरण रेटत आहेत, असा आरोप त्यावेळी झाला होता. या आरोपांमुळे गडकरी संतप्त झाले होते.

या पार्श्वभूमीवर रस्ते वाहतूक मंत्रालयाने हा नवा प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावानुसार केंद्रीय मोटर वाहन नियमावली-१९८९ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. ज्यामुळे ई८५ (८५ टक्के इथेनॉलमिश्रित पेट्रोल) आणि

पान ७ वर

## दलित तरुणाचा कोठडीत संशयास्पद मृत्यू

■ बीड

**अल्पवयीन** मुलीचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल असलेल्या आणि न्यायालयीन कोठडीत असलेल्या एका दलित तरुणाचा संशयास्पद मृत्यू झाल्याप्रकरणी तरुणाचे कुटुंबीय आणि दलित संघटना आक्रमक होत मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिल्याने जिल्ह्यात काल प्रचंड तणाव निर्माण झाला.

आशिष अशोक धिवार असे मयत तरुणाचे नाव आहे. तो केज तालुक्यातील कालेगाव घाट येथील रहिवासी होता. केज पोलिसांनी त्याला काही दिवसांपूर्वी पोक्सोच्या गुन्ह्यात अटक केली होती. त्याच्या पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली होती. तो बीड जिल्हा कारागृहात होता. सोमवारी संध्याकाळच्या सुमारास त्याची प्रकृती अचानक बिघडली. त्यामुळे त्याला बीड जिल्हा रुग्णालयातील कैद्यांसाठीच्या वॉर्डमध्ये हलवण्यात आले होते. दुसऱ्याच दिवशी मंगळवारी सकाळी सव्वा आठ वाजण्याच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर धिवारचे कुटुंबीय आक्रमक झाले. दोन दिवसांच्या पोलीस कोठडीत पोलिसांनी केलेल्या अमानुष मारहाणीमुळे त्याला अंतर्गत रक्तस्राव झाला आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला, असा आरोप धिवारच्या कुटुंबियांनी केला.

**बीड जिल्ह्यात प्रचंड तणाव**

डेमॉक्रेटीक पार्टी ऑफ इंडियाचे (डिपीआय) महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चंदने यांनी धिवारच्या कुटुंबियांची भेट घेऊन सर्व घटनाक्रम समजून घेतला. त्यानंतर त्यांनी केज पोलिसांवर गंभीर आरोप केले. पोलिसांनी आशिषची घरापासून पोलीस ठाण्यापर्यंत धिंड काढली. यादरम्यान पोलिसांनी त्याला प्रचंड मारहाण केली.

## पवार विरुद्ध पवार होऊ देणार नाही! सुप्रिया सुळे यांचे वक्तव्य

■ मुंबई

**बारामती** पोटनिवडणुकीनंतर २०२९ च्या निवडणुकांबाबत पुन्हा एकदा 'पवार विरुद्ध पवार' अशी लढत होण्याच्या चर्चांना उधाण आले आहे. याबाबत राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी एका मुलाखतीत आगामी निवडणुकांमध्ये मी कधीही पवार विरुद्ध पवार होऊ देणार नाही, असे स्पष्ट करत कुटुंबातील राजकीय संघर्ष टाळण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच गरज पडल्यास वेगळा निर्णय घेण्याची तयारी दर्शवली. त्यांच्या या वक्तव्यामुळे बारामतीतील भविष्यातील राजकीय समीकरणांबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे.



सुप्रिया सुळे म्हणाल्या की, २०२९ मध्ये काय होईल, आघाड्या कशा तयार होतील, हे आत्ताच सांगता येणार नाही. राजकारणात परिस्थिती सतत बदलत असते. त्यामुळे योग्य वेळीच निर्णय घेतला जाईन. मात्र, मी कधीही पवार विरुद्ध पवार होऊ देणार नाही. सुप्रिया सुळे कोणत्याही पवारांच्या विरोधात निवडणूक लढणार नाही. गरज पडली तर मी वेगळा निर्णय घेईन.

## मुस्लीम अल्पवयीन मुलीचे पालकत्व हिंदू दाम्पत्याला

**मद्रास हायकोर्टाचा निर्णय**

■ चेन्नई

**एका** दुर्मीळ अशा स्वरुपाच्या खटल्यात मद्रास उच्च न्यायालयाने नुकताच एक अत्यंत महत्त्वाचा निकाल दिला.हिंदू-मुस्लीम असा भेदभाव न करता एका मुस्लीम अल्पवयीन मुलीचे कायदेशीर पालकत्व न्यायालयाने त्या मुलीचा तिच्या जन्मापासून सांभाळ करणाऱ्या हिंदू दाम्पत्याला दिले.

एस बालाजी आणि त्यांच्या पत्नीने कुटुंब न्यायालयाने दिलेल्या निकालाला मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपीठासमोर आव्हान दिले होते. बालाजी दाम्पत्य निपुत्रिक होते. हे दाम्पत्य वास्तव्यास असलेल्या परिसरात एक कचरा वेचून उदरनिर्वाह चालवणारी एक महिला रहात होती. तिला तीन मुले आहेत. तिच्या पतीने निधन झाल्यानंतर तिला तीन मुलांचा सांभाळ करणे कठीण जात होते. त्यामुळे तिने स्वखुशीने आपली तिसरी मुलगी बालाजी दाम्पत्याला दत्तक दिली होती. जन्मापासून ही मुलगी बालाजी दाम्पत्याकडे वाढली आहे. मात्र या मुलीचे कायदेशीर पालकत्व देण्याची बालाजी दाम्पत्याची विनंती कुटुंब न्यायालयाने

पान २ वर

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## वादळ येत आहे! ट्रम्प यांचा इशारा

■ वॉशिंग्टन

**इराणसोबत** युद्धविराम करार न झाल्याच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'द स्टॉर्म इज कमिंग' या पोस्टमुळे लष्करी कारवाईबाबत तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. 'गेम ऑफ थ्रोन्स' या लोकप्रिय मालिकेतील विंटर इज कमिंग हा संवाद आगामी संकटाचे सूचक मानले जाते. त्याच धर्तीवर ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर स्वतःचा एआय-निर्मित फोटो शेअर करत 'द स्टॉर्म इज कमिंग, नथिंग कॅन स्टॉप व्हॉट इज कमिंग'. म्हणजेच वादळ येत आहे, जे कोणीही थांबवू शकत नाही, असा संदेश दिला.

ट्रम्प यांच्या सोशल मीडिया पोस्टकडे राजकीय संदेश म्हणून बारकाईने पाहिले जाते. विशेषतः इराणसोबत युद्धविराम करार न झाल्याच्या बातम्यांमुळे या पोस्टचा संबंध वाढत्या तणावाशी जोडला जात आहे. मात्र, या पोस्टचा कोणत्याही विशिष्ट धोरणात्मक निर्णयाशी किंवा लष्करी कारवाईशी थेट संबंध असल्याचा अधिकृत दुजोरा मिळाला नाही.




### कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या १२६.३१ डॉलर प्रति बॅरलपर्यंत

मध्यपूर्वेतील वाढत्या युद्धजन्य परिस्थितीमुळे कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. कच्च्या तेलाची किंमत १२६.३१ डॉलर प्रति बॅरलपर्यंत पोहोचली असून मार्च २०२२ नंतरचा हा सर्वोच्च स्तर आहे. सध्या कच्चे तेल सुमारे १२३ डॉलर प्रति बॅरल दराने व्यवहारात आहे.

## घरांमधील सोने बँकेत आणण्यासाठी केंद्र सरकारची नवी योजना

■ मुंबई

**सोने** आयात करावे लागणे, कमी व्हावे यासाठी लोकांच्या घरांमध्ये पडून असलेले सोने बँकांमध्ये आणण्याची योजना केंद्र सरकारने आखली आहे. त्यासाठी गोल्ड मॉनेटायझेशन योजना अधिक प्रभावी आणि अधिक सुलभ करण्यात येणार आहे.

ऑल इंडिया जेम अँड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिलने (जीजेसी) याबाबत पुढाकार घेतला असून रिझर्व्ह बँक आणि अर्थ मंत्रालयाकडे प्रस्ताव सादर केला आहे. जीजेसीने यासंदर्भात नुकतेच एक निवेदन प्रसिध्द केले. या निवेदनात ही माहिती देण्यात आली आहे. या नव्या योजनेत सराफ व्यापाऱ्यांना जोडून योजनेची व्याप्ती वाढवण्याची सूचना करण्यात आली आहे. या प्रस्तावानुसार ग्राहकांकडील सोने डिजिटल स्वरुपात रुपांरित केले जाणार आहे. हे डिजिटल सोने ग्राहकांच्या बँक खात्यात जमा राहील. त्यामुळे सोने घरात नुसते पडून राहण्यापेक्षा ग्राहकांना त्यावर परतावा मिळवता येणार आहे. या नव्या योजनेमुळे ग्राहकांकडे असलेली सोन्याची नाणी, बिस्किटे, लगड आणि दागिने यांचे आर्थिक साधनांमध्ये रुपांतर करणे शक्य होईल. घरात पडून असलेले सोने चलनात आल्यामुळे त्याचा फायदा चालू खात्यातील तूट कमी करण्यासाठी होणार आहे.

## पॉड टॅक्सीसाठी ४९९ झाडे तुटणार पर्यावरणप्रेमींचा आक्रमक पवित्रा

**चार प्रवासी क्षमता असलेल्या एका 'फॅन्सी असलेल्या पॉड टॅक्सी'साठी ४९९ झाडे तुटणार आहेत. झाडे पॉड टॅक्सी प्रकल्पाच्या कुर्ला ते वांद्रे या मार्गावर आहेत. यामध्ये लहान-मोठ्या आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांचा समावेश आहे. ४९९ झाडे कापण्याच्या प्रस्तावाविरोधात पर्यावरणप्रेमींनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.**

■ मुंबई

**पर्यावरण** कार्यकर्त्या नताशा परेरा यांनी म्हटले आहे की, बीकेसीमध्ये इलेक्ट्रिक बसेस, अंडरग्राउंड मेट्रो इत्यादी सुविधा उपलब्ध असताना या पॉड टॅक्सीवर वायफळ खर्च करण्याची काय गरज आहे? हा प्रकल्प एमएमआरडीए, सेबी, एनएसई, जीएसटी भवन यांसारख्या सरकारी कार्यालयांना जोडणारा असल्याने, करदात्यांच्या पैशातून याचा फायदा केवळ सरकारी कर्मचाऱ्यांनाच होईल. मेट्रो आणि बुलेट ट्रेन प्रकल्पांमुळे बीकेसीमधील अनेक झाडे आधीच तोडली गेली आहेत. जगातील १०० उष्ण शहरांच्या यादीत भारतीय शहरांचा समावेश होत असताना, उरलेली झाडे का कापली जात आहेत?

उद्यान विभागाच्या एका वरिष्ठ



अधिकाऱ्याने माहिती दिली की, मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले की, ही झाडे पॉड टॅक्सी प्रकल्पाच्या कुर्ला ते वांद्रे या मार्गावर आहेत.

## पाकिस्तानात जैशचा वरिष्ठ कमांडर मौलाना सलमानचा संशयास्पद मृत्यू

■ इस्लामाबाद

**बंदी** घालण्यात आलेल्या जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा वरिष्ठ कमांडर मौलाना सलमान अझहर याचा पाकिस्तानातील बहावलपूर येथे संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाला. एका अज्ञात वाहनाने त्याला धडक दिल्याने या दहशतवादी नेत्याचा मृत्यू झाला.

मौलाना सलमान अझहर हा जैशच्या वरिष्ठ नेतृत्वाशी अत्यंत जवळचा मानला जात होता आणि संघटनेच्या कारवायांमध्ये त्याची महत्त्वाची भूमिका होती. दरम्यान, गेल्या वर्षी जून महिन्यातही जैश-ए-मोहम्मदचा आणखी एक वरिष्ठ कमांडर मौलाना अब्दुल अझीझ इसार याचा पाकिस्तानातील पंजाब प्रांतात संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाला होता. इसारच्या मृत्यूचा व्हिडिओ परदेशी माध्यमांतही प्रसारित झाला होता. भारतातील अनेक मोठ्या दहशतवादी हल्ल्यांचा तो सूत्रधार मानला जात होता. आता जैशच्या दुसऱ्या नेत्याचा संशयास्पद मृत्यू झाला आहे.

## नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाला विरोध संतप्त शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

■ सांगली

**प्रस्तावित** नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाला कडेगाव आणि पलूस तालुक्यातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. महामार्ग बाधित शेतकऱ्यांनी शक्तिपीठ महामार्ग विरोधी कृती समितीची स्थापना केली असून ४ मे रोजी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

आमचा जीव जाईल, पण जमीन देणार नाही, असा आक्रमक पवित्रा घेत शेतकरी रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहेत. दोन्ही तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांची मोठी एकजूट झाली असून गावोगावी बैठकींचा धडाका सुरू आहे. प्रशासनाला दिलेल्या निवेदनांद्वारे शेतकऱ्यांनी आपला तीव्र विरोध नोंदवला आहे. उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडेही या संदर्भात तक्रारी सादर करण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांच्या मते, डोंगराएवढ्या टेकड्या फोडून, दगड-गोटे वेचून आणि रक्ताचे पाणी करून आम्ही या जमिनी सुपीक केल्या आहेत. ताकारी योजनाच्या पाण्यामुळे या भागातील ओसाड माळरान नंदनवनात परिवर्तित झाले आहे. आता कोणतीही गरज नसताना सरकार हा महामार्ग लादत आहे. प्रस्तावित रेखांकनानुसार कडेगाव आणि पलूस तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर सुपीक जमीन या प्रकल्पात जाणार आहे. यामध्ये शेतीजमीन, फळबागा, जनावरांचे गोठे तसेच घरे यांचा समावेश आहे.

याशिवाय पर्यावरणदृष्ट्याही महत्त्वपूर्ण असलेल्या सागरेश्वर वन्यजीव अभयारण्य परिसरालाही या महामार्गाचा फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व पंचायत राज विभाग
उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

# महालक्ष्मी सरस
२०२६



## दर्जेदार उत्पादने, वैविध्यपूर्ण हस्तकला आणि ग्रामीण चवीचा अनोखा संगम!

ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता गटातील महिलांच्या कर्तृत्वाचे व कौशल्याचे आणि उत्पादित मालाचे

# प्रदर्शन व विक्री

## उद्घाटन समारंभ,
दिनांक २ मे २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता

- उद्घाटक -

**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

- प्रमुख उपस्थिती -

**एकनाथ शिंदे**
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**सुनेत्रा अजित पवार**
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**जयकुमार गोरे**
मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज

**योगेश कदम**
मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज

भव्य प्रदर्शन आणि विक्री

दिनांक: १ ते १४ मे २०२६ | वेळ: सकाळी १० ते रात्री १० पर्यंत
स्थळ: एम एम आर डी ए मैदान, बांद्रा कुर्ला संकुल, मुंबई

प्रवेश विनामूल्य

मुख्य आकर्षण: खाद्यपदार्थ, मसाले, हातमागावरचे कपडे, ग्रामीण कलाकुसर, स्वतंत्र वातानुकूलित फूडकोर्ट आणि खूप काही.

संपूर्ण वातानुकुलीत

## मुंबईकरांच्या दमदार प्रतिसादात उद्यापासून सुरु...




**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**एकनाथ शिंदे**
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**सुनेत्रा अजित पवार**
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**जयकुमार गोरे**
मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज

**योगेश कदम**
मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# पूर्ण विकसित महाराष्ट्राचा ध्यास हवा

*सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिवशंभु राजा,*
*दरीदरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा।*

या केवळ काव्यपंक्ती नाहीत तर महाराष्ट्र भूमीचा गौरव सांगणारे आणि इतिहासातही चैतन्य निर्माण करणारे चरित्रगीत आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीची ६६ वर्ष पूर्ण होऊन ६७ व्या वर्षात आपण पदार्पण करीत आहोत. भूतकाळाकडे नजर टाकताना महाराष्ट्राची यशस्वी घोडदौड प्रत्येक मराठी माणसामध्ये अभिमान निर्माण करणारी ठरते. कारण ज्या संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातून आणि १०५ हुतात्म्यांच्या बलिदानातून निर्माण झालेला हा महाराष्ट्र म्हणजे स्वतःच्या सार्वकालिक सार्वभौमत्वासाठी लढला गेलेला तो लढा होता. देशाच्या इतिहासामध्ये कोणत्याही राज्याला महाराष्ट्रासारखा संघर्ष करावा लागलेला नाही आणि त्या संघर्षातून निर्माण झालेला महाराष्ट्र आज देशातल्या सगळ्या राज्यांपेक्षा विकसित आणि प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्राला मिळालेली शिवरायांच्या शौर्याची परंपरा ही आजही सह्याद्रीच्या दऱ्यादऱ्यातून ऐकायला मिळते, अनुभवायलाही मिळते, सह्याद्रीने आपल्या अंगाखांद्यावर महाराष्ट्राच्या लढाऊपणाचे संगोपन केले म्हणूनच या सह्याद्रीच्या कुशीत असलेल्या गडकिल्ल्यांकडे नजर टाकताच प्रत्येक मराठी माणसाच्या बाहुमध्ये शौर्याचे स्फुरण चढू लागते आणि आपण एका युगपुरूषाच्या दिव्य कर्तृत्वाचे वारसदार आहोत याचा अभिमानही वाटू लागतो. आज भलेही त्या गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी सरकार कमी पडत असेल परंतु आज ना उद्या या सर्व गडकिल्ल्यांच्या संवर्धनाची व्यापक मोहीम घेतली जाईल. ज्या किल्ल्यांना जागतिक वारसांच्या यादीमध्ये स्थान मिळू शकते. तो वारसा टिकवण्यात जर इथले सरकार अपयशी ठरणार असेल तर त्याच्याइतकी लज्जास्पद गोष्ट दुसरी कोणतीही नसेल. काळाबरोबर महाराष्ट्राने केलेला विकास, प्रगती या तर घडून आलेल्या आहेतच. परंतु आजचा हा महाराष्ट्र दिन साजरा करीत असताना आणि महाराष्ट्राविषयी अभिमान बाळगत असताना महाराष्ट्राला अजून बरेच काही करायचे शिल्लक आहे. किंबहुना काही मूलभूत बाबींकडे सरकारचे दूर्लक्ष झाल्याचे स्पष्ट दिसून येते. आजचा महाराष्ट्र दिन अशा या सगळ्या सिंहावलोकनासाठी तितकेच योग्य औचित्य ठरते.

**अजूनही स्वयंपूर्णता नाही**

जवळपास बारा कोटी लोकसंख्या असलेला महाराष्ट्र आज देशातील प्रगतीशील महाराष्ट्र राज्य म्हणून ओळखले जाते. अन्य राज्यांपेक्षा महाराष्ट्राचा आर्थिक विकास अधिक आहे असेही सांगितले जाते. एवढेच नव्हे तर संपूर्ण देशाची आर्थिक राजधानी महाराष्ट्रात आहे, असे असूनही आज महाराष्ट्रावर आठ लाख कोटींचे कर्जही आहे. हे कर्ज प्रामुख्याने राज्याच्याच विकासकामांसाठी घ्यावे लागते अशा प्रकारचा युक्तिवादही केला जातो. परंतु हाच विकास अजूनही ग्रामीण भागापर्यंत योग्य पद्धतीने पोहचलेला नाही. सध्याचा विकास हा शहरकेंद्रीत विकास असल्याचेच म्हणावे लागते. सरकारी धोरणांमधून शहरांमधल्या सोयीसुविधांना आणि उद्योगवाढीलाही प्रोत्साहन दिले जाते. स्वाभाविकपणे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकत नाहीत आणि म्हणूनच ग्रामीण भागातल्या तरुणाला नाईलाजाने शहरांचा आसरा घ्यावा लागतो. अक्षरशः अपुऱ्या वेतनमानामध्ये काम करण्याची वेळ त्याच्यावर येते. यातला आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे अजूनही महाराष्ट्राच्या साक्षरतेचा दर ८० टक्क्याच्यावर गेलेला नाही. परिणामी अर्धसाक्षर किंवा निरक्षर लोक ग्रामीण भागात आदिवासी पाड्यांमध्ये राहातात आणि तिथे त्यांना उपलब्ध होणारा रोजगार अतिशय तुटपुंज्या स्वरूपाचा असतो. जे राज्य संपूर्ण देशात स्वतःच्या अर्थविकासाचे गोडवे गाते त्या राज्यातला चाळीस टक्के ग्रामीण भाग अनेक मूलभूत सेवासुविधांपासून वंचित आहे. आजच्या तंत्रज्ञान युगामध्येसुद्धा इंटरनेट किंवा मोबाईलसाठीचे नेटवर्कही धडपणाने उपलब्ध होत नाही. या चाळीस टक्के भागातल्या तरुणांचा होत असलेला कोंडमारा दुर्लक्षित करण्यासारखा नाही. निदान पुढच्या चार ते पाच वर्षामध्ये महाराष्ट्राची विकासाची दिशा ठरवताना ती ग्रामीण विकासावर भर देणारी आणि रोजगाराभिमुख झाली पाहिजे. अगदी गेल्याच आठवड्यात राज्य सरकारने दोन लाख कोटींचे गुंतवणूक करार केले. परंतु यातून हमखासपणे पाच पन्नास हजार रोजगार निर्माण झाले पाहिजेत तरच या गुंतवणूक करारांना काही अर्थ उरेल. आर्थिक राजधानी असूनही राज्य अजूनही आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण नाही. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

**विकास कामातली विसंगती**

ज्या महाराष्ट्राने अगदी शिवरायांपासून ते बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत सर्वांनी दिशा दाखवण्याचे काम केले. त्या महाराष्ट्राची दशा पूर्णपणे सुधारलेली नाही. हे वास्तव आहे. हिंदवी स्वराज्याचे म्हणजेच परकियांच्या आक्रमणांना परतवून लावण्याचे काम शिवरायांनी केले. परंतु आजही गुलामीची मानसिकता किंवा धर्मांतर किंवा लव्ह जिहादासारखी प्रकरणे महाराष्ट्रामध्ये कशी काय निर्माण होतात याचे आश्चर्य वाटते. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला संविधान देऊन समता, बंधुता आणि स्वातंत्र्याचा उद्घोष केला. मात्र आज महाराष्ट्रात जाती व्यवस्थेचे भूत अजूनही पाहायला मिळते. शिक्षणाला सर्वाधिक प्राधान्य देणाऱ्या बाबासाहेबांच्या महाराष्ट्रात सामान्य घरातल्या मुलांना उच्चशिक्षण घेणे परवडेनासे झाले आहे. म्हणूनच आजचा महाराष्ट्र दिन ज्या अभिमानाने आपण साजरा करीत आहोत. त्याच्या बरोबरीने विकासातल्या विसंगतींचे स्मरणही गरजेचे ठरते. राज्यात मराठी शाळा धडाधड बंद पडत आहेत. तर दुसरीकडे मराठी भाषेचा आग्रह धरण्याचा प्रकार पाहायला मिळतो. सर्वाधिक नद्यांचे वरदान लाभलेले असताना जलसिंचनाच्याबाबतीत महाराष्ट्र मागे पडतो आणि राज्यातल्या पंचवीस टक्के भागाला दुष्काळाचा सामना करावा लागतो. आज शहरांमध्ये मेट्रो किंवा आंतरराष्ट्रीय विमानतळांसाठी हजारो कोटी रुपये खर्च होत आहेत पण राज्यातली खेडी तालुका आणि जिल्ह्यांना जोडण्यासाठी चांगले रस्ते होऊ शकलेले नाहीत. विसंगतीची यादी बरीच मोठी होऊ शकेल. केवळ प्रगतीशीलच नव्हे तर पूर्ण विकसित महाराष्ट्राचे ध्येय साकार करण्याचा आराखडा आणि राज्यातल्या ग्रामीण भागाला विकासाच्या प्रक्रियेत अग्रस्थान देण्याचा ध्यास घेतला गेला पाहिजे.

**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

अनुभव हा गुरुपेक्षाही श्रेष्ठ असतो.
कारण गुरु फक्त शिक्षण देतो, पण अनुभव आपल्याला जीवनाचा खरा अर्थ शिकवतो.

**पंचांग**

**शुक्रवार, १ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**



* वैशाख पौर्णिमा
* नक्षत्र - स्वाती
-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० तूळ

रवी उदय- ०६-१२
रवी अस्त- १९-००

**महाराष्ट्र दिन, कामगार दिन, बुद्ध पौर्णिमा, मराठी राजभाषा दिन, कूर्म जयंती, वैशाख स्नान समाप्ती, पृष्टिपती विनायक जयंती, पौर्णिमा समाप्ती रात्री ११.५२, पहाटे पूर्वेला बुध लोप**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

दूरध्वनी : 250102/ 2551501
ई-मेल : **amca.vvmc@gov.in**
**जा.क्र.: व.वि.श.म./श.अ/बांध/४१/२०२६**
**दि. : ३०/०४/२०२६**

**वसई विरार शहर महानगरपालिका**
**मुख्यालय, विरार (प.)**
**ता. वसई, जि. पालघर, पिन - ४०१३०३**

**वसई - विरार शहर महानगरपालिका**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**जाहीर ई - निविदा सुचना**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रभाग समिती 'ए ' विरार (प) प्रभाग क्र ४ मध्ये नारंगी येथे तुकाराम स्मृती ते किशोर पाटील यांच्या घरापर्यंत पाईप गटार नव्याने बांधणे. | रु.३७,०५,८८९/- |
| २. | प्रभाग समिती 'ए' विरार (प) प्रभाग क्र २० मध्ये सचिनम अपार्टमेंट ते पर्ल कोरल अपार्टमेंट पाईप गटार बांधणे | रु.४१,७९,७०८/- |
| ३. | प्रभाग समिती 'ए' विरार (प) प्रभाग क्र २० मध्ये स्टेशन जवळील जैन घर देरासर ते सरस्वती विद्यामंदिर जवळील मुख्य गटारापर्यंत गटार बांधणे. | रु.६३,५१,३६५/- |
| ४. | प्रभाग समिती 'ए' विरार (प) प्रभाग क्र २९ मध्ये सोमनाथ दर्शन सोसायटी ते मुख्य नाल्यापर्यंत गटाराचे बांधकाम करणे. | रु.२९,०७,०८९/- |
| ५. | प्रभाग समिती 'ए' विरार (प) प्रभाग क्र ०२ (०४ जुने) मध्ये किरण पाटील ते सुलोचना पाटील ते पद्मान पाटील यांच्या घरापर्यंत पाईप गटाराचे बांधकाम करणे. | रु.२६,७४,७३९/- |
| ६. | विरार (प.) प्र. क्र. ०२ (जुना ०३) मध्ये सुदेश चौधरी यांच्या घरापासून ते मुख्य गटारापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | रु.२६,१९,३८५/- |
| ७. | विरार (प.) प्र. क्र. १४ मध्ये भाऊनगर येथील किंग्स्टन इमारती पासून ते आकाश इमारतीपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस आर. सी. सी. पाईप गटार बांधणे. | रु.८५,१३,९५६/- |
| ८. | विरार (प.) प्र. क्र. १४ मध्ये तिरुपती नगर फेस १ येथील कस्तुरी पार्क इमारत ते वासू कमल इमारत पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | रु.५०,९१,५७२/- |
| ९. | विरार (प.) प्र. क्र.१७ मध्ये बोळींज मुख्य रस्त्यावरील पोलीस चौकी पासून ते पटेल टिंबर मार्ट पर्यंत आर. सी. सी. गटार बांधणे | रु.७३,८८,२२३/- |

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'ए' बोळींज विभागातील खालील उल्लेखीत कामांचे कोरे निविदा फॉर्म (https://mahatenders.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर दि. ०६/०५/२०२६ पासुन उपलब्ध होणार आहे. ई टेंडरिंग बाबत अधिक माहितीसाठी ई-निविदा कक्ष, वसई विरार शहर महानगरपालिका, विरार, मुख्यालय येथे संपर्क साधावा.

सही/-
**(प्रदिप पाचंगे)**
प्र. शहर अभियंता
वसई-विरार शहर महानगरपालिका

**Please Visit our official web-site (https://mahatenders.gov.in)**

**जावक क्र. : व.वि.श.म./मा.व.ज./१९१/२०२६**

## क्रीडा

# गुजरातने बंगळुरुला ४ विकेट राखून नमवले

## अर्शद, होल्डर व रशीद खान यांची चमकदार गोलंदाजी



**अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुविरुद्ध आज झालेला आयपीएलचा ४२ वा सामना गुजरात टायटन्सने ४ विकेट राखून जिंकला. पाचव्या विजयासह गुजरातने गुणतालिकेत १० गुणांसह पाचवे स्थान कायम ठेवले. प्रथम फलंदाजी केलेल्या बंगळुरुच्या संघाला गुजरातने सर्वबाद १५५ धावांवर रोखले. मग गुजरातने ६ विकेट गमावून १५.५ षटकांत विजयी आकडा गाठल्याने बंगळुरुला तिसरा पराभव पत्करावा लागला.**

■ अहमदाबाद

**गुजरातचे** अर्शद खान (३)व जेसन होल्डर (२) व रशीद खान (२) यांनी कसून गोलंदाजी करुन बंगळुरुच्या फलंदाजांना मोठे फटके मारूच दिले नाहीत. बंगळुरुचा पहिला बळी ३४ धावांवर जेकब बेथेलच्या रुपात गेला. विराट कोहली १३ चेंडूंत २८ धावांवर बाद झाला. देवदत्त पडिक्कल व रजत पाटीदार यांनी संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. संघाची धावसंख्या ७.३ षटकांत २ बाद ७९ अशी असताना रजत पाटीदारला अर्शद खानने माघारी धाडले. तो १५ चेंडूंत १९ धावा करून बाद झाला. त्यानंतर एकामागून एक बंगळुरुचे फलंदाज तंबूत परतले. जितेश शर्माने १, टिम डेव्हिडने ९, कृणाल पंड्याने ४, देवदत्त पडिक्कलने सर्वाधिक ४०, रोमारियो शेफर्डने १७, व्यंकटेश अय्यरने १२, जोश हॅझलवुडने ० व भुवनेश्वर कुमारने नाबाद १५ धावा केल्यामुळे बंगळुरुने सर्वबाद १५५ धावांपर्यंत मजल मारली. या धावसंख्येचा पाठलाग गुजरातचे सलामीवीर फलंदाज साई सुदर्शन आणि शुभमन गिल यांनी सुरुवातीपासून बंगळुरुच्या गोलंदाजांवर आक्रमण केले. या जोडीने पहिल्या विकेटसाठी २.५ षटकांत ४६ धावांची भागीदारी केली. साई सुदर्शन (६) व कर्णधार शुभमन गिल (४३) हे झपटपट बाद झाले. जोस बटलर व वॉशिंग्टन सुंदर या जोडीने संघाची धावसंख्या ७.२ षटकांत २ बाद ९२ वर पोहोचवली. मात्र जोस बटलरचा भुवनेश्वर कुमारने त्रिफळा उडवला, बटलरने १९ चेंडूंत ३९ धावा केल्या. मग एम शाहरुख खान फक्त ८ धावा करुन तंबूत परतला. त्यापाठोपाठ वॉशिंग्टन सुंदर १२ चेंडूंत १२ धावा करुन माघारी परतल्यामुळे गुजरातची धावसंख्या ५ बाद १११ धावा अशी झाली होती. त्यानंतर जेसन होल्डरही १२ धावांवर बाद झाला. रशीद खान ७ धावा आणि राहुल तेवतिया २७ धावा करून नाबाद राहिल्याने संघाला १५.५ षटकांत विजय मिळवून दिला.

## आजपासून आंतर सहकारी बँक सांघिक कॅरम स्पर्धा

■ मुंबई

**एलआयसी-** आनंदराव अडसूळ ट्रस्ट ट्रॉफी आंतर सहकारी बँक आणि शालेय मुलामुलींच्या सांघिक कॅरम स्पर्धेस १ मेपासून दादर पश्चिम येथील सिबिईयु सभागृहात प्रारंभ होणार आहे. लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया पुरस्कृत दोन सांघिक कॅरम स्पर्धांचे विजेतेपद पटकाविण्यासाठी ८ सहकारी बँकांचे कॅरम संघ आणि नुकत्याच झालेल्या विविध जिल्ह्यांतील ६४ शालेय मुलामुलींच्या निवड चाचणीमधून निर्माण झालेले ६ संघ १ ते ३ मेपर्यंत झुंजणार आहेत. आनंदराव अडसूळ चॅरिटेबल ट्रस्ट, को-ऑपरेटीव्ह बँक एम्प्लॉईज यूनियन आणि आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्तचा हा उपक्रम सहकारी बँक कर्मचारी आणि शालेय मुलामुलींसाठी विनाशुल्क आहे.

## एलआयसी कल्पेश कोळी स्मृती क्रिकेट स्पर्धा उद्यापासून सुरु

■ मुंबई

**प्रतिष्ठित** ३४ वी एलआयसी कल्पेश गोविंद कोळी स्मृती क्रिकेट स्पर्धा' २ मेपासून सुरू होणार आहे. न्यू हिंद स्पोर्टिंग क्लबतर्फे आणि मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने आयोजित केली जाणारी ही स्पर्धा २ ते २३ मे या कालावधीत मुंबई व उपनगरातील विविध मैदानांवर खेळवली जाईल. 'युथ टॅलेंट सर्च' हे ब्रीदवाक्य असलेल्या या या स्पर्धेसाठी १६ वर्षांखालील मुलांच्या १६ संघांची विभागणी ४ गटांत करण्यात आली असून २ मे आणि ३ मे रोजी पहिली फेरी रंगणार आहे.

**जाहीर सूचना**

श्री.जेरी डिमेलो, लोक यमुना को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.मिलिटरी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०५९ चे सदस्य आणि सोसायटीच्या ए१ विंगमधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्र.१०२ चे धारक. श्री. जेरी डिमेलो यांचे दिनांक २६.०८.२०२२ रोजी, कोणतीही नामनिर्देशन न करता निधन झाले. त्यांची पत्नी, श्रीमती मॅंडालीन जेरी डीमेलो यांनी, सदर फ्लॅटमधील त्यांचा १००% हिस्सा आणि सोसायटीचे सदस्यत्व आपल्या नावावर हस्तांतरित करण्यासाठी दावा केला असून तसा अर्ज केला आहे.
सोसायटी याव्दारे, सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील, मयत सभासदाच्या सदर शेअर्स व हितसंबंधाचे हस्तांतरण होण्यास वारस किंवा अन्य दावेदारी/आक्षेप घेणारे यांच्याकडून काही दावे किंवा आक्षेप असल्यास ते ह्या सूचनेच्या प्रसिध्दीपासून १५ दिवसांत सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणासाठी त्याच्या/तिच्या/त्यांच्या दावा/ आक्षेपांच्या पुष्ठ्यर्थ अशी कागदपत्रे आणि अन्य पुराव्याच्या प्रतींसह मागविण्यात येत आहेत.
वर दिलेल्या मुदतीत जर काही दावे/आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर मयत सभासदाच्या सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील शेअर्स व हितसंबंधाशी सोसायटी उपविधीतील तरतुदींमधील दिलेल्या मार्गाने व्यवहार करण्यास सोसायटी मोकळी असेल. जर सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणास काही दावे/आक्षेप सोसायटीने प्राप्त केले तर, सोसायटीच्या उपविधीतील तरतुदींनुसार त्यावर सोसायटी कार्यवाही करेल. सोसायटीच्या नोंदणीकृत उपविधींची प्रत दावेदार/आक्षेपकाव्दारे निरीक्षणाकरिता सोसायटीचे कार्यालय/सोसायटीचे सचिव यांच्याकडे सदर सूचना प्रसिध्दीच्या तारखेपासून कालावधी समाप्तीच्या तारखेपर्यंत उपलब्ध आहेत.

**सही/-**
**मा.सचिव**
**लोक यमुना को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.**
मिलिटरी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०५९

**ठिकाण: मुंबई**
**दिनांक: ०१.०५.२०२६**

**बँक ऑफ महाराष्ट्र**
**Bank of Maharashtra**
भारत सरकार का उद्यम
*एक परिवार एक बैंक*

**मुंबई उत्तर विभागामधील बँक ऑफ महाराष्ट्रच्या ४५ शाखा, १ करन्सी चेस्ट आणि १ विभागीय कार्यालयाचे विद्युत लेखापरीक्षण**

बँक ऑफ महाराष्ट्र, मुंबई उत्तर विभाग, ६३२, यशोमंगल, गांधीनगर, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१ हे मुंबई उत्तर विभागामधील बँक ऑफ महाराष्ट्रच्या ४५ शाखा, १ करन्सी चेस्ट आणि १ विभागीय कार्यालयाच्या विद्युत लेखापरिक्षणाकरिता अर्ज आमंत्रित करीत आहेत.
अर्ज नमुन्यासह सर्व इतर तपशील आमच्या वेबसाईटः www.bankofmaharashtra.bank.in/tenders वर उपलब्ध आहेत.
अर्जाचा नमुना बँक ऑफ महाराष्ट्र वेबसाईटवरून दि. ३०.०४.२०२६ पासून डाऊनलोड करता येईल. बँक कोणतेही कारण न दर्शविता कोणतेही/सर्व अर्ज फेटाळण्याचे हक्क राखून ठेवीत आहेत. अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक २०.०५.२०२६ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत. आवश्यक शुल्काशिवाय आलेले अर्ज किंवा अपूर्ण/स्वाक्षरी न केलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

सही/-
उप विभागीय व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र,
मुंबई उत्तर विभाग, मुंबई

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**e-TENDER NOTICE – 003 / 2026–27**

Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website https://eprocurement.mahagenco.in.

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost in Rs. | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| TN0007 CHP2 | 3000067517 | Biennial Maintenance contract of siemens make PLC System at CHP- II, 500 MW TPS Khaperkheda | 1590000.00 | 19400.00 |
| TN0008 AHP1 | 3000067587 | Procurement of Collecting Plates for unit 1 ESP during COH for AHP-1. | 5209400.00 | 55594.00 |
| TN0009 AHP1 | 3000067604 | PROCUREMENT OF EMITTING ELECTRODES AND VARIOUS SPARES OF ESP DURING U3 AOH for AHP-I | 1732816.05 | 20828.16 |
| TN0010 AHP1 | 3000067605 | PROCUREMENT OF ESP INTERNAL SPARES FOR U#3 AOH FOR AHP-I. | 1534760.08 | 18847.60 |
| TN0011 BM1 | 3000067622 | WORK OF PROVIDING IBR ASSISTANCE TO RLA STUDY DURING AOH OF UNIT NO. 1. | 1031064.80 | 13810.65 |
| TN0012 BM1 Refloated | 3000067628 | SUPPLY AND INSTALLATION OF PA FAN NDV 18 INLET DAMPER IN UNIT 1 & 2. | 1385018.00 | 17350.18 |
| TN0013 CS | 3000067631 | Procurement of glands packing, spiral & serrated gaskets for COH of U#1 | 243469.00 | 5934.69 |
| TN0014 CHP1 | 3000067656 | ANNUAL WORK CONTRACT FOR CONVEYOR BELT JOINTING / PATCHING BY COLD / HOT VULCANIZING PROCESS ALONG WITH PROVISION OF REQUIRED MATERIAL KIT FOR CHP-I (4 X 210 MW), TPS KHAPERKHEDA. | 4639872.94 | 49898.73 |
| TN0015 CS | 3000067677 | APPROVAL FOR PROCUREMENT OF VARIOUS LOW PRESSURE AND LOW TEMPERATURE STEEL CONSUMABLE FOR COH. | 406021.00 | 7560.21 |
| TN0016 SAFETY | 3000067733 | TESTING AND CERTIFICATION OF LIFTING TOOLS, TACKELS AT STAGE I ANS II AT KHAPERKHEDA TPS. | 387400.65 | 7374.01 |
| TN0017 CM1 | 3000067760 | Miscellaneous civil works for modification and maintenance of various structures & buildings at all levels & locations on as and when required basis, 4 x 210MW, TPS Khaperkheda. | 6021844.34 | 63718.44 |
| TN0018 TM1 Refloated | 3000067757 | Procurement of Turbine Rotor High Density Balancing Weight for Unit 2 COH Khaperkheda TPS Turbine Maintenance – I. | 496000.00 | 8460.00 |
| TN0019 TM1 Refloated | 3000067758 | Work of In-situ repairs of high pressure critical 2500 class valves and HP bypass valves and HP/IP control valves of TG set during short shut down on as and when require. | 1008213.21 | 13582.13 |
| TN0020 TM1 Refloated | 3000067769 | PROCUREMENT OF BREECH NUT FOR TG SET COH OF UNIT 1. | 2160000.00 | 25100.00 |
| TN0021 TM1 Refloated | 3000067770 | MACHINING OF U-SEAL RING REQUIRED FOR UNIT 3 CAPITAL OVERHAULING. | 925000.00 | 12750.00 |
| TN0022 BM1 | 3000067797 | SERVICING / REPAIRING OF LOAD HANGERS AND SUPPORTS OF CRITICAL PIPELINES, SMALL PIPELINES AND DUCT HANGERS UNIT NO. 1 AOH. | 163550.45 | 4907.00 |

Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.

Sd /-
Chief Engineer (O&M)
MSPGCL, Thermal Power Station, Khaperkheda.

# मानखुर्दमधील एमआयएमच्या नगरसेविकेचे पद धोक्यात! जातप्रमाणपत्र अवैध ठरवले

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेच्या मानखुर्द शिवाजीनगर येथील प्रभाग क्रमांक १३८ मधून निवडून आलेल्या एमआयएमच्या नगरसेविका रोशन शेख यांचे नगरसेवकपद धोक्यात आले आहे. जात प्रमाणपत्र समितीच्या पडताळणीत कागदपत्रे बोगस असल्याचे निष्पन्न झाल्याने रोशन शेख यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवले आहे.

नगरसेविका रोशन सिंग यांचे नगरसेवकपद धोक्यात आल्यामुळे प्रभाग क्रमांक १३८ मध्ये दुसऱ्या क्रमांकावर असलेले सपाचे पराभूत उमेदवार महफूज आझमी यांनी नगरसेवकपद मिळावे, यासाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. मात्र,जात पडताळणी समितीच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचे एमआयएमचे गटनेते विजय उबाळे यांनी म्हटले आहे. जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर नगरसेविका म्हणून आपल्या पदाच्या जोरावर रोशन शेख यांनी मिळवलेले सर्व लाभ आणि मानधन त्यांच्याकडून वसूल करण्यात यावे.

तसेच जात प्रमाणपत्र रद्द केल्याची नोंद अधिकृत दप्तरांमध्ये करावी आणि त्याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करावा, असे निर्देश जात प्रमाणपत्र समितीने पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांसह संबंधित विभागाला दिले आहेत.

# दिल्लीमध्ये १४२ कंत्राटी शिक्षकांचा जनगणनेचे काम करण्यास नकार

■ नवी दिल्ली

**दिल्लीमधील** कंत्राटी शिक्षकांनी जनगणनेचे काम करण्यास नकार दिला. यामुळे वार्षिक करारावर असलेल्या १४२ शिक्षकांची नोकरी धोक्यात आली. या शिक्षकांची तात्काळ हकालपट्टी करण्याची शिफारस जुन्या दिल्लीमधील जिल्हाधिकाऱ्यांनी शिक्षण संचालकांना पत्र लिहून केली.

या शिक्षकांना एका पत्राच्या माध्यमातून जनगणनेचे काम करणे हे अत्यावश्यक आहे, असे सांगण्यात आले होते. शिवाय या पत्रातून असेही म्हटले होते की, सहकार्य न केल्यास याचे परिणाम गंभीर होतील. असे असूनही तब्बल १४२ शिक्षकांनी हे काम करण्यास नकार दिला. प्रशासनाने म्हटले आहे की, या गोष्टींकडे दुर्लक्ष केले तर सध्या जनगणनेच्या कामात व्यग्र असलेल्या शिक्षकांवरही या गोष्टीचा परिणाम होणार आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# मेळघाटातील प्रत्येक गावाला दररोज किमान एक टँकर पाणीपुरवठा करा!

**हायकोर्टाचे आदेश**

■ मुंबई

**विदर्भ** आणि मराठवाड्यातील तापमान सध्या ४५ अंश सेल्सिअसच्याही वर पोहोचले असताना मेळघाटातील दुर्गम भागात पाण्याची तीव्र टंचाई आहे.त्यामुळे अशा परिस्थितीत तिथले लोक कसे जगत असतील, याची कल्पनाही करवत नाही, अशी चिंता व्यक्त करत मुंबई उच्च न्यायालयानं मेळघाटातील प्रत्येक गावाला दिवसातून किमान एक पिण्याच्या पाण्याचा टँकर उपलब्ध करून देण्याचे आदेश राज्य सरकारला दिले आहेत.

सामाजिक कार्यकर्ते बंडू साने यांच्यासह इतरांनी मेळघाटातील कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. या याचिकांवर काल न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती हितेन वेणेगावकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी याचिकाकर्त्यांचे वकील जुगल गिल्डा यांनी न्यायालयाला सांगितलं की, धारणी, चिखलदरा आणि चुर्णी यांसारख्या भागातील जलस्त्रोत पूर्णपणे आटले आहेत. बाष्पीभवनाचा वेग प्रचंड असल्याने विहिरी कोरड्या पडल्या गावकरी पाण्यासाठी वणवण करीत आहेत, त्यावर हायकोर्टानं गंभीर चिंता व्यक्त करत याबाबत राज्य सरकारला विचारणा केली. त्यावेळी राज्य सरकारच्या वतीनं अतिरिक्त सरकारी वकील भूपेश सामंत यांनी कोर्टाला माहिती देताना सांगितलं की, राज्य सरकार या समस्येवर तातडीनं उपाययोजना करत आहे.

# जळगावच्या पाचोऱ्यात फळ विक्रेत्याचा उष्माघाताने मृत्यू

■ जळगाव

**जळगाव** जिल्ह्यातील पाचोरा शहरात वाढत्या उष्णतेचा कहर वाढला आहे. उष्माघातामुळे फळ विक्रेता आनंद नथू भोई (३२) यांचा मृत्यू झाला. यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

आनंद भोई हे छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात फळ विक्रीचा व्यवसाय करत होते. उन्हाळ्याच्या दिवसांत दिवसभर कडक उन्हात उभे राहून व्यवसाय करावा लागत असल्याने त्यांना उष्णतेचा तीव्र त्रास जाणवत होता.

तापमानाचा पारा सतत वाढत असताना शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणे आणि उष्णतेचा परिणाम वाढत गेल्याने त्यांची प्रकृती अचानक खालावली.

उपचारासाठी नेण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले. अत्यावश्यक कामाशिवाय दुपारच्या वेळेत घराबाहेर पडू नये.

# वसंत मोरेंकडे उबाठा पुणे शहरप्रमुखपदाची धुरा

■ पुणे

**पुणे** महापालिका निवडणुकीतील निराशाजनक कामगिरीनंतर उबाठा पक्षाने संघटनात्मक पातळीवर बदल केले आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये नव्या जबाबदाऱ्या देत संघटना मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू झाला. यामध्ये वसंत मोरे यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपवत त्यांची पुणे शहरप्रमुखपदी नियुक्ती केली. नुकत्याच पार पडलेल्या पुणे महानगरपालिका निवडणुकीत उबाठाला मनसे आणि काँग्रेससोबत युती करूनही अपेक्षित यश मिळाले नाही. निवडणुकीची जबाबदारी सांभाळणाऱ्या वसंत मोरे यांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते.

# मुंबई शहरातील पाणीकपातीचा थेट फटका ठाणे शहरालाही

■ ठाणे

**मुंबईत** जाहीर करण्यात आलेल्या पाणीकपातीचा थेट फटका ठाणे शहरालाही बसण्याची दाट शक्यता आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या ७ तलावांमधील पाणीसाठा २८ टक्क्यांवर आल्यामुळे प्रशासनाने १५ मेपासून १० टक्के पाणीकपात जाहीर केली. या निर्णयामुळे मुंबईकडून ठाण्याला होणाऱ्या पाणीपुरवठ्यातही कपात करावी लागणार आहे. मुंबई पालिकेकडून ठाणे पालिका क्षेत्राला दररोज ९० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा केला जातो. मुंबईत पाणीकपात लागू झाल्यामुळे त्याचा फटका प्रामुख्याने ठाण्यातील कोपरी व वागळे इस्टेट परिसराला बसू शकतो. कारण मुंबईच्या पाण्याचा वापर या भागात केला जातो. त्यामुळे या पुरवठ्यातही १० टक्क्यांची कपात होण्याची शक्यता आहे. ठाणे शहर व आसपासच्या परिसरातील पाणीपुरवठा प्रभावित होऊ शकतो.

# राजस्थानमध्ये धावत्या कारला आग कुटुंबातील पाच जण जिवंत जळाले

**अलवर- राजस्थानातील** अलवर जिल्ह्यात मध्यरात्री अत्यंत भीषण अपघात झाला. दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गावर धावत्या कारला अचानक आग लागल्याने एकाच कुटुंबातील पाच जण जिवंत जळाले. तर विनोद कुमार मेहर ८० टक्के भाजल्याने गंभीर जखमी झाला आहे. लक्ष्मणगड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजपूरजवळ, द्रुतगती मार्गावरील ११५/३०० क्रमांकाच्या खांबाजवळ ही दुर्घटना झाली. दिल्लीहून कोटाकडे जात असताना कारला अचानक आग लागली. या दुर्घटनेत मध्य प्रदेशातील श्योपूर जिल्ह्यातील चैनपुरा गावचे रहिवासी असलेले पाच जण मृत्युमुखी पडले.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
E-TENDER NOTICE

MSETCL SRM invites online RFx (Ex. e-Tender) from the Registered Contractors for MAHATRANSCO e-Tendering (SRM) website for below mentioned work.

**2nd Call E-tender No./ RFx No. 7000039564 (2nd Call) - Name of work: "SAS Upgradation and Restoration of existing Protection & SCADA System at 132/33 kV Jawhar S/s" Estimated Cost: Rs.1,76,34,719.00** with **Tender Fees:** Rs. 5000/-+ GST.

**Date for Sale and Submission of the e-Tender Documents: From 30.04.2026 @ 18.00 Hrs. to 11.05.2026 @ 18.00 Hrs.**

For detailed information visit our website:
**https://srmetender.mahatransco.in**

**Sd/**
**Superintending Engineer, Protection, Automation and Communication Circle, Vashi.**

महावितरण
**निविदा सूचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कंपनीच्या संचलन व सुव्यवस्था विभागीय कार्यालय वाशी अंतर्गत एक वर्षाच्या करारासाठी वाशी विभागातील वितरण रोहीत्रे, उपरी व भूमिगत उच्च दाब वाहिन्या तसेच लघुदाब वाहिन्या यांच्या प्रतीबंधात्मक देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी नामांकित परवानाधारक विद्युत ठेकेदारांकडुन निविदा मागविण्यात येत असून सदर ई-निविदा क्रमांक: टेंडर क्र. ०१ टेंडर क्र: ०२, टेंडर क्र: ०३/२०२६-२७ अशा एकुण ०३ निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या असून, सदर निविदा विक्रीसाठी दि. ३०.०४.२०२६ ते ०८.०५.२०२६ पर्यंत उपलब्ध राहतील तसेच निविदा भरण्याची अंतिम तारीख दि. ०८.०५.२०२६ (११:००) पर्यंत राहील .निविदेच्या आवृत्तीत/शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे महावितरणच्या वेबसाईटवर प्रकाशित केला जाईल.

**Ref: PRO NO - 50** **कार्यकारी अभियंता, सं.व.सु. विभाग वाशी**

महावितरण
**विज बंदबाबत जाहीर निवेदन**

कल्याण पश्चिम विभागातील सर्व विज ग्राहकांना कळविण्यात येते की, २२ केव्ही **गोदरेज हिल** उपकेंद्रातुन निघणाऱ्या **२२ केव्ही रिव्हर साईड** या वाहिनीवर देखभाल व दुरूस्तीच्या कामासाठी **दि. ०२.०५.२०२६ रोजी सकाळी ०८.०० ते १२.०० वाजेपर्यत** खाली नमुद केलेल्या भागाचा विज पुरवठा बंद राहील याची कृपया नोंद घ्यावी. ग्राहकांच्या होणाऱ्या गैरसोईबद्दल महावितरण कंपनी दिलगीर आहे.

| अनु. क्र. | उपकेंद्र | फिडर | भागाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | २२ केव्ही गोदरेज हिल | रिव्हर साईड | गोदरेज हिल, थारवानी कॉलनी, अर्बन व्हिला, शनी मंदीर, ओशाधारा ग्रीन, मिडटाऊन अवेन्यु, माधव सृष्टी, गगनगिरी, झोझवाला, वाधवा हाईट १ / २, मलबेरी मिडोज, रिव्हर साईड परिसर. |

**कार्यकारी अभियंता, कल्याण पश्चिम विभाग**

**फॉर्म बी**
**जाहीर उद्घोषणा**
*(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२)*

**प्रध्वी मल्टीट्रेड प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| अ.क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | **प्रध्वी मल्टीट्रेड प्रायव्हेट लिमिटेड** |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | २६ फेब्रुवारी, २०११ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी - मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्र./ मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U51101MH2011PTC214077 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा पत्ता | खोली क्र. १२, माता रामदेवी निवास, एन. एस. रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र - ४०००८०. |
| ६. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा दिनांक | २८.०४.२०२६ |
| ७. | कॉर्पोरेट ऋणकोचे परिसमापन सुरु होण्याचा दिनांक | २९.०४.२०२६ (आदेश दिनांक १७.०४.२०२६ आणि आदेश दि. २९.०४.२०२६ रोजी प्राप्त) |
| ८ | परिसमापक म्हणून काम करणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण पत्ता | श्री. हस्ती मल कछरा IBBI/IPA-002/IP-N00342/2017-2018/10992 |
| ९ | मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ताः ए-६०२, निर्माण अपार्टमेन्ट्स, पंप हाऊस, विकास नगर, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००९३. ईमेलः hastimal.kachhara@gmail.com |
| १० | परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | श्री. हस्ती मल कछरा मे. वॉटरफॉल इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रा. लि., पत्ताः १२२१, मेकर चेंबर V, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०००२१. ई-मेल आयडीः pmpl.cirp@gmail.com |
| ११ | दावा सादर करण्याचा अंतिम दिनांक | २९ मे, २०२६ (परिसमापन आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवस) |

याद्वारे सूचना देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण मुंबई यांनी **दि. १७.०४.२०२६** रोजी **प्रध्वी मल्टीट्रेड प्रायव्हेट लिमिटेड**चे परिसमापन सुरु करण्याचे आदेश दिले आहेत. (एनसीएलटी वेबसाईटवर दि. २९.०४.२०२६ रोजी अपलोड करण्यात आला).

**प्रध्वी मल्टीट्रेड प्रायव्हेट लिमिटेड** च्या भागधारकांना याद्वारे त्यांचे दावे दि. २९.०५.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापकाकडे बाब क्र. १० समोर नमूद पत्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व भागधारक त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

जर भागधारकाने त्यांचे दावे परिसमापन प्रक्रियेदरम्यान सादर न केल्यास, भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तीकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ अन्वये कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रियेदरम्यान अशा भागधारकाद्वारे सादर केलेले दावे, कलम ३८ अन्वये सादर करण्यात आल्याचे मानले जाईल.

**सही/-**
**हस्ती मल कछरा, परिसमापक**
आयबीबीआय नोंदणी क्र.: IBBI/IPA-002/IP-N00342/2017-2018/10992
एएफए क्र.: AA2/10992/02/311226/204156 दि. ३१.१२.२०२६ पर्यंत वैध
दिनांकः ३०.०४.२०२६ ठिकाणः मुंबई

भारत की जनगणना 2027 CENSUS OF INDIA
गृह मंत्रालय भारत सरकार

# आपली जनगणना, आपला विकास

## (जनगणना २०२७ चा पहिला टप्पा)

भारत सरकारकडून गृह यादीकरण व गृहनिर्माण जनगणना लवकरच आपल्या राज्य/केंद्रशासित प्रदेशात सुरू होणार आहे. यापूर्वी, १५ दिवसांची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे, ज्यामध्ये आपण स्वत:ची माहिती ऑनलाइन भरू शकता.







## स्व-गणना (Self-Enumeration)

सोपे आणि सुरक्षित डिजिटल सुविधा

### स्व-गणना कशी करावी?

१. अधिकृत पोर्टलला भेट द्या (se.census.gov.in)
२. आपल्या मोबाईल क्रमांकाचा वापर करून OTP द्वारे लॉगिन करा
३. आपले राज्य, जिल्हा आणि स्थानिक तपशील निवडा
४. डिजिटल नकाशावर आपल्या घराचे स्थान चिन्हांकित करा
५. घर व कुटुंबाशी संबंधित माहिती भरा
६. सादर केल्यानंतर तुम्हाला एक SE ID मिळेल.
७. हा SE ID सुरक्षित ठेवा.
८. गणनाकर्मी (Enumerator) भेटीसाठी आल्यावर त्यांना हा SE ID द्या.
९. गणनाकर्मी माहितीची खात्री करतील.

**याचे फायदे**
- वेळेची बचत
- अचूक माहिती
- जलद माहिती प्रक्रिया

**लक्षात ठेवा: स्व-गणना ही एक विशेष सुविधा आहे.**
जर तुम्हाला स्व-गणना करता आली नाही तरी काळजी करू नका; नियोजित कालावधीत गणनाकर्मी तुमच्या घरी येऊन माहिती नोंदवतील.

तुमची सर्व माहिती पूर्णपणे गोपनीय आणि सुरक्षित ठेवली जाईल

## महाराष्ट्र

**स्व-गणना**
**१ मे ते १५ मे**

**गृह यादीकरण**
**१६ मे ते १४ जून**

CBC 19108/13/0070/2627

चला, आपली जबाबदारी पार पाडूया आणि जनगणनेत सहभागी होऊया

टोल-फ्री - १८५५
CensusIndia2027

नवाकाळ

Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial



# राज्यात जनगणनेचा पहिला टप्पा आजपासून सुरू होणार

**मुंबई -** देशातील १६ वी जनगणना २०२७ प्रक्रिया राज्यात वेगाने सुरू होत असून महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हा प्रशासनाने यासाठी व्यापक तयारी केली आहे. या जनगणनेत घर गणनेच्या पहिल्या टप्प्याला उद्या म्हणजेच १ मेपासून सुरुवात होत असून हा टप्पा १५ मेपर्यंत चालणार आहे. या कालावधीत नागरिकांनी उपलब्ध संकेतस्थळावर स्व-गणना करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. राज्यात जनगणना प्रक्रियेअंतर्गत घराची स्थिती, कुटुंबातील सदस्यांची माहिती, उपलब्ध सुविधा तसेच मालमत्तेशी संबंधित एकूण ३३ प्रश्न विचारले जाणार आहेत. यानंतर घरांची नोंदणी प्रक्रिया १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. विशेष म्हणजे, यंदाची जनगणना प्रथमच पूर्णपणे डिजिटल पद्धतीने केली. जात असून प्रथमच नागरिकांना स्व-गणनेचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे.

# ४ तास उशीर! मग विमान रद्द! मुंबई विमानतळावर प्रवाशांचा गोंधळ

■ मुंबई

**मुंबईतील** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर मोठा गोंधळ उडाला. स्पाइसजेटच्या विमान उड्डाणाला चार तास उशीर झाला आणि मग उड्डाण अखेर रद्द करण्यात आले. यामुळे प्रवाशांमध्ये संतापाची लाट उसळली. ही फ्लाइट टर्मिनल-१ वरून उड्डाण करणार होती. या विमानाला सुरुवातीपासूनच विलंब होत होता. प्रवाशांना वारंवार उड्डाण वेळ पुढे ढकलल्याची माहिती दिली जात होती. मात्र, जवळपास चार तास प्रतीक्षा केल्यानंतर अचानक फ्लाइट रद्द केल्याची घोषणा झाली. यामुळे आधीच त्रस्त झालेल्या प्रवाशांनी संताप व्यक्त केला. प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला.

# वादग्रस्त वक्तव्यानंतर बागेश्वर बाबांनी शिवरायांच्या चित्राचा कुर्ता घातला

■ नागपूर

**नागपूर** येथे झालेल्या कार्यक्रमात धीरेंद्र कृष्ण शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा पुन्हा एकदा चर्चेत आले. छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यानंतर त्यांनी आपण शिवभक्त असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न करत शिवरायांचे चित्र असलेला कुर्ता परिधान केला.



नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट परिसरात भारतदुर्गा मंदिराच्या शिलान्यासानिमित्त आयोजित धर्मसभेत त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्यातील एक प्रसंग सांगितला. त्यांच्या म्हणण्यानुसार, अनेक युद्धांनंतर थकलेल्या शिवरायांनी स्वराज्य सांभाळण्याची विनंती रामदास स्वामींना केली होती. मात्र, यावर शिवप्रेमींनी आक्षेप घेतला. त्यांच्यावर इतिहासाशी विसंगत आणि दिशाभूल करणारे वक्तव्य केल्याचा आरोप केला. या वादानंतर राज्यभरातून प्रतिक्रिया उमटल्या आणि बागेश्वर बाबांनी अखेर माफी मागितली होती.

# आमदारकी हुकली तरी संयम ट्रोलिंगला केशव उपाध्येंचे प्रत्युत्तर

■ मुंबई

**राज्यातील** विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी भाजपाने आपल्या उमेदवारांची यादी जाहीर केली असून या यादीत काही अपेक्षित नावांना संधी न मिळाल्याने पक्षांतर्गत चर्चांना उधाण आले आहे. विशेषतः पक्षाचे उपाध्यक्ष आणि दीर्घकाळ प्रवक्तेपद सांभाळणारे केशव उपाध्ये यांना समाज माध्यमांवर सतरंजी उचलणारे अशा शब्दांत ट्रोल करण्यात आले. यावरून उपाध्ये यांनी संघर्ष पथ पर जो मिले, यह भी सही, असे म्हणत प्रत्युत्तर दिले आहे. केशव उपाध्ये यांना उमेदवारी न दिल्याने राजकीय वर्तुळात प्रतिक्रिया उमटत आहेत.गेल्या काही निवडणुकांमध्ये उपाध्ये यांच्या नावाची सातत्याने चर्चा होत होती, मात्र प्रत्येक वेळी अंतिम टप्प्यात त्यांना संधी मिळाली नाही. याबाबत केशव उपाध्ये यांनी एक्स पोस्ट करत म्हटले की, घेतले न हे व्रत अंधतेने. केशव उपाध्ये पोस्टमध्ये म्हणाले की, २५-३० वर्षांपूर्वी विचारधारेचे काम सुरू करताना कुठे, काय, कोण, कधी होणार याचा विचार केला नव्हता.

# धारमध्ये पिकअपचा अपघात १६ जणांचा मृत्यू! १३ जखमी

■ धार

**मध्य** प्रदेशमधील धार येथे अपघातात १६ जणांचा मृत्यू झाला असून १३ जण जखमी झाले आहेत. मजुरांना घेऊन जाणारा पिकअप ट्रक टायर फुटल्याने हा अपघात घडला. मृतांमध्ये ६ लहान मुलांचा समावेश असल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

ही घटना काल रात्री सुमारे ८.३० वाजता इंदूर-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील चिकलिया फाटा परिसरात, जिओ पेट्रोल पंपाजवळ घडली. पिकअप ट्रक सुमारे १०० किमी प्रतितास वेगाने धावत असल्याची प्राथमिक माहिती आहे. अचानक टायर फुटले. पिकअपने डिव्हायडर ओलांडून ४ ते ५ पलट्या घेत स्कॉर्पिओला धडक दिली. अपघाताच्या वेळी पिकअपमध्ये सुमारे ४६ मजूर प्रवास करत होते. ट्रकमधील प्रवाशांची संख्या क्षमतेपेक्षा अधिक असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या अपघातानंतर घटनास्थळी मोठा गोंधळ उडाला होता.

जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून गंभीर जखमी ७ जणांना इंदूर येथे हलवण्यात आले आहे. सुमारे १५



जखमींवर स्थानिक रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत, तर काहींना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. इंदूरमध्ये डॉक्टरांचे विशेष पथकही तैनात करण्यात आले आहे. या घटनेबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला.

# भोंदू खरातला ८व्या गुन्ह्यात पोलीस कोठडी नाकारली

■ नाशिक

**नाशिकमधील** महिला अत्याचार प्रकरणातील आठव्या गुन्ह्यात भोंदू अशोक खरातला नाशिक सत्र

## १२ मेपर्यंत न्यायालयीन कोठडी

न्यायालयाने पोलीस कोठडी न देता १२ मेपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. सुरक्षेच्या कारणास्तव यावेळीही त्याला प्रत्यक्ष न्यायालयात न आणता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारेच हजर करण्यात आले. या प्रकरणात विशेष तपास पथक आणि सरकारी वकिलांनी पोलीस कोठडी मागत जोरदार युक्तिवाद केला होता. तपास अधिकाऱ्यांना पीडित महिलेचे लैंगिक शोषण, विनयभंग आणि फसवणूक यासोबतच तिच्या कुटुंबाची आर्थिक फसवणूक झाल्याचाही संशय आहे. मात्र, आरोपीच्या वकिलांनी पोलीस कोठडीची गरज नसल्याचा युक्तिवाद करत बचाव केला. त्यानंतर न्या. बी. एन. ईचपुराणी यांनी एसआयटीचा युक्तिवाद अमान्य करत पोलीस कोठडी नाकारली आणि न्यायालयीन कोठडी सुनावली. उद्या नवव्या गुन्ह्याच्या संदर्भात त्याला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. यावेळी विशेष तपास पथक त्याला आपल्या ताब्यात घेण्यासाठी पुन्हा पोलीस कोठडीची मागणी करणार आहे.

# तीस्ता सेतलवाड यांना पासपोर्ट परत देण्यास कोर्टाचा नकार



■ नवी दिल्ली

**सामाजिक** कार्यकर्त्या तीस्ता सेतलवाड यांनी पासपोर्ट परत मिळावा असा अर्ज केला होता. मात्र सुप्रीम कोर्टाने हा अर्ज फेटाळला. परदेश प्रवासाचा निश्चित कार्यक्रम ठरल्यानंतर नव्याने अर्ज करू शकता, असे कोर्टाने सांगितले.

जुलै २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने २००२ गुजरात दंगलीप्रकरणी बनावट पुरावे तयार केल्याच्या प्रकरणात तीस्ता सेतलवाड यांना जामीन मंजूर करताना घातलेल्या अटींनुसार त्यांनी गुजरातमधील न्यायालयात त्यांचा पासपोर्ट जमा केला होता. हा पासपोर्ट परत मिळावा असा त्यांनी अर्ज केला. या अर्जावर सुनावणी करताना न्या. दिपांकर दत्ता, एस.सी. शर्मा आणि आलोक अराधे यांच्या खंडपीठाने म्हटले की, अशाप्रकारे आम्ही तुमचा पासपोर्ट परत देणार नाही. तुम्ही तुमचा प्रवासाचा तपशील सादर करू शकता. पासपोर्ट परत मिळवण्यासाठी योग्य कारण दाखवावे लागेल. सेतलवाड यांच्या वतीने वरिष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सांगितले की, पुढील वर्षी पासपोर्टचे नूतनीकरण करावे लागणार असल्याने अर्जदाराला पासपोर्टची गरज आहे. परदेश प्रवासासाठी व्हिसा आणि इतर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वेळेत पासपोर्ट मिळणे आवश्यक असते. कमी वेळेमुळे अर्जावर सुनावणी मिळवणे आव्हानात्मक ठरते, असेही त्यांनी नमूद केले. यावर खंडपीठाने म्हटले की, हा मूलभूत अधिकारांचा परदेश प्रवासाचा प्रश्न असल्याने आम्ही नक्कीच विलंब करणार नाही. या अर्जावर सुनावणी घेण्यासाठी तातडीने तीन न्यायाधीशांचे खंडपीठ स्थापन करण्यात आल्याचेही न्यायालयाने नमूद केले.

# राज्यात १२ मे दरम्यान चक्रीवादळ पेरण्या जूनमध्ये तीन टप्प्यात

■ परभणी

**राज्यात** १२ मेच्या दरम्यान पुन्हा चक्रीवादळासारखी परिस्थिती निर्माण होऊन वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे, असा अंदाज हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी वर्तविला आहे.

पंजाबराव डख यांनी नुकताच ताज्या हवामान अंदाजाचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारीत केला आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, राज्यात १२ मेच्या दरम्यान चक्रीवादळाची शक्यता आहे. १३ आणि १४ मे रोजी राज्यभरात अवकाळी पाऊस हजेरी लावण्याची शक्यता आहे. खरिपासाठी पुरेसा पाऊस पडणार असून रब्बीसाठी पोषक ठरणारा परतीचा पाऊसही हजेरी लावून जाईल. सध्या पावसाळ्यासाठी जेमतेम ३८ दिवस बाकी आहेत. यंदा जून महिन्यात तीन टप्प्यांत पेरण्या कराव्यात. राज्यातील मान्सूनवर एल निनोचा कोणताही परिणाम जाणवणार नाही. त्यामुळे घाबरून जाण्याचे कारण नाही. मे महिन्यात मात्र अवकाळी पाऊस हजेरी लावणार असल्याने शेतकऱ्यांनी शेतीची मशागतपूर्व कामे करण्यास काहीच हरकत नसल्याचा सल्ला पंजाबराव डख यांनी दिला आहे.

# अल्पवयीन अत्याचार पीडितांचा गर्भपातसंदर्भातील कायदा बदला

## सुप्रीम कोर्टाचा केंद्राला सल्ला

■ नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयाने बलात्कार पीडितांच्या गर्भपातसंबंधी महत्त्वाचा निर्णय देताना केंद्र सरकारला कायद्यात बदल करण्याचा सल्ला दिला. नको असलेल्या गर्भधारणेचे ओझे महिलांवर लादता येणार नाही. असे स्पष्ट करत न्यायालयाने अल्पवयीन मुलीच्या गर्भपाताला परवानगी देणाऱ्या आदेशाविरोधात दाखल याचिका फेटाळून लावली.

अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) ने दाखल केलेल्या याचिकेत एका १५ वर्षीय बलात्कार पीडित मुलीचा सुमारे ३० आठवड्यांचा गर्भपात करण्यास न्यायालयाने आधी परवानगी दिली होती. मात्र, एम्सने

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

या निर्णयाला विरोध करत पुनर्विलोकन आणि त्यानंतर उपचारात्मक याचिका दाखल केली होती. ती न्यायालयाने मान्य केली नाही.

न्यायालयाने स्पष्ट केले की, डॉक्टर किंवा रुग्णालय आपला निर्णय रुग्णावर लादू शकत नाही. मुलगी आणि तिच्या कुटुंबाला सर्व वैद्यकीय माहिती देऊन त्यांना स्वतः निर्णय घेण्याची संधी मिळाली पाहिजे. 'हा निर्णय त्या मुलीचा आहे, रुग्णालयाचा नाही. सुनावणीदरम्यान सरकारच्या वकिलांनी सांगितले की, गर्भ ३० आठवड्यांचा असल्याने तो जिवंत जन्माला येऊ शकतो आणि गर्भपात प्रक्रियेमुळे मुलीच्या आरोग्यावर धोका निर्माण होऊ शकतो.

# रुपयाची ऐतिहासिक घसरण नीचांकी पातळीवर पोहोचला

■ नवी दिल्ली

**भारतीय** परकीय चलन बाजारात आज मोठी खळबळ उडाली आहे. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया इतिहासातील सर्वात नीचांकी पातळीवर घसरला आहे. आज रुपया प्रति डॉलर सुमारे ९५.२७ पर्यंत कोसळला, तर दिवसभरात तो ९५.२० च्या आसपास व्यवहार करत होता.

रुपयाने ९५ ची पातळी ओलांडण्याची ही पहिलीच वेळ ठरली आहे. यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर तसेच सामान्य नागरिकांच्या खिशावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घसरणीमागे जागतिक स्तरावरील घडामोडी प्रमुख कारणीभूत ठरत आहेत.

कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली मोठी वाढ हे यामागचे मुख्य कारण असून ब्रेंट क्रूडचे दर प्रति बॅरल १२२ डॉलरच्या पुढे गेले आहेत, जे तीन वर्षांतील उच्चांक मानले जात आहेत. अमेरिका-इराण तणाव आणि मध्य-पूर्वेतील अस्थिरतेमुळे तेलाच्या किमतीत झपाट्याने वाढ झाली आहे.

# न्यायालयाने ईडीला मिर्चीच्या आणखी मालमत्ता जप्त करण्यास परवानगी दिली

■ मुंबई

**मनी लॉन्डरिंग** प्रतिबंधक कायदा अंतर्गत विशेष न्यायालयाने अंडरवर्ल्डमधील इक्बाल मिर्ची आणि त्याच्या कुटुंबाशी संबंधित आणखी मालमत्ता फ्युजिटिव्ह इकॉनॉमिक ऑफेंडर्स कायदा २०१८ अंतर्गत जप्त करण्यास ईडीला परवानगी दिली आहे. न्यायालयाने आपल्या आदेशात एफईओ कायद्याच्या कलम ५(१) अंतर्गत 'एक्झिबिट सी'मध्ये नमूद मालमत्ता जप्त करण्यास परवानगी दिली. तसेच सुरू असलेल्या तपासात सापडलेल्या अतिरिक्त मालमत्तांचा समावेश करण्यासाठी कलम १३ अंतर्गत पूरक अर्ज दाखल करण्याची मुभाही ईडीला दिली.

हा अर्ज ईडीच्या मुंबई झोनल कार्यालय-१ कडून दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान या मालमत्ता उघड झाल्याचे आणि त्या आधीच पीएमएलए अंतर्गत जप्ती प्रक्रियेत असल्याचे ईडीने न्यायालयाला सांगितले. या मालमत्तांमध्ये वरळी येथील राबिया मॅन्शन, मरियम लॉज आणि सी व्ह्यू या सुमारे ४९७०.४१ चौरस मीटर क्षेत्रफळाच्या तीन भूखंडांचा समावेश आहे. तसेच दुबईतील हॉटेल मिडवेस्ट अपार्टमेंट आणि कॉर्पोरेट बे व डीईसी टॉवर्समधील १४ स्थावर मालमत्तांचाही समावेश आहे. ईडीच्या मते, या मालमत्ता इक्बाल मेमन उर्फ इक्बाल मिर्ची याने गुन्हेगारी मार्गाने मिळवलेल्या पैशातून खरेदी करण्यात आल्या असून त्या बेनामी व्यक्तींच्या नावावर ठेवण्यात आल्या होत्या.

# महसुली तूट असलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचा समावेश! आर्थिक फटका

■ नवी दिल्ली

**महसुली** तूट आणि वाढते कर्ज असलेल्या राज्यांना भविष्यात आर्थिक संकटांचा सामना करणे कठीण जाऊ शकते. अशा राज्यांना विकासकामांवरील खर्च कमी करावा लागू शकतो किंवा केंद्र सरकारकडे अधिक निधी मागावा लागू शकतो, असे अर्थ मंत्रालयाने म्हटले आहे. अर्थ मंत्रालयाच्या एप्रिल २०२६ च्या आर्थिक आढावा अहवालानुसार, देशातील १८ मोठ्या राज्यांपैकी ९ राज्यांमध्ये २०२६-२७ या वर्षात महसुली तूट राहण्याची शक्यता आहे. हिमाचल प्रदेश, पंजाब, केरळ, आंध्र प्रदेश, राजस्थान, हरियाणा, कर्नाटक, महाराष्ट्र आणि छत्तीसगड या राज्यांचा त्यात समावेश आहे. महसुली तूट म्हणजे पगार, पेन्शन, अनुदान आणि व्याज यांसारख्या नियमित खर्चाचा सरकारचा भार हा कर आणि शुल्कातून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा जास्त असतो. अहवालात म्हटले आहे की, महसुली तूट असलेल्या राज्यांवर कर्जफेडीचा मोठा ताण आहे. अनेक राज्यांना त्यांच्या उत्पन्नातील १५ टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम केवळ कर्जावरील व्याज भरण्यासाठी खर्च करावी लागते. पंजाबमध्ये ही स्थिती सर्वाधिक गंभीर असून राज्याच्या उत्पन्नातील २२.८ टक्के रक्कम व्याजासाठी खर्च होते. अर्थ मंत्रालयाने सांगितले की, अशा राज्यांकडे आर्थिक संकटांना तोंड देण्यासाठी मर्यादित पर्याय उरतात.



# पंतप्रधान मोदींचा लवकरच युरोप आणि यूएईचा दौरा

■ नवी दिल्ली

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी पुढील महिन्यात चार देशांच्या युरोप दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्या दरम्यान चर्चेत व्यापार आणि सुरक्षा सहकार्य, युक्रेन व पश्चिम आशियातील संघर्ष तसेच ऊर्जा आणि व्यापार पुरवठा साखळीत निर्माण झालेल्या अडथळ्यांवर उपाययोजना या मुद्द्यांवर विशेष भर असणार आहे. १५ ते २० मे दरम्यान मोदी नेदरलँड्स, स्वीडन, नॉर्वे आणि इटली या देशांना भेट देणार आहेत. नॉर्वेमध्ये ते तिसऱ्या भारत-नॉर्डिक शिखर परिषदेत सहभागी होणार असून दौऱ्याच्या सुरुवातीला किंवा शेवटी संयुक्त अरब अमिराती (यूएई) येथे थोड्या वेळेसाठी जातील.

हा दौरा मोदी आणि नेदरलँड्सचे नवे पंतप्रधान रॉब जेटन यांच्यातील पहिल्या प्रत्यक्ष भेटीचाही ठरणार आहे. फेब्रुवारीत पंतप्रधान झालेल्या जेटन यांनी मार्चमध्ये मोदींसोबत दूरध्वनीवर चर्चा केली होती. स्वीडन दौऱ्यात व्यापार, नवकल्पना आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकार्याचा आढावा घेतला जाणार आहे. स्वीडनने २०१८ मध्ये पहिल्या भारत-नॉर्डिक शिखर परिषदेचे आयोजन केले होते. नॉर्वे दौऱ्यातील तिसरी भारत-नॉर्डिक शिखर परिषद हा संपूर्ण दौऱ्याचा मुख्य भाग असेल. भारत, डेन्मार्क, आइसलँड, नॉर्वे, स्वीडन आणि फिनलंडचे नेते या परिषदेत सहभागी होतात. २०२४ मध्ये भारतासोबत मुक्त व्यापार करार करणाऱ्या युरोपियन फ्री ट्रेड असोसिएशनचा नॉर्वे सदस्य आहे. इटली दौऱ्यात व्यापार, सुरक्षा आणि लोकसंपर्क क्षेत्रातील सहकार्य वाढवण्यावर भर दिला जाणार आहे. युरोपियन युनियनचा प्रमुख सदस्य असलेल्या इटलीसोबत भारत-ईयू मुक्त व्यापार करारावरही चर्चा अपेक्षित आहे.

# रुपाली चाकणकरांची कोर्टात धाव अब्रुनुकसानीची तक्रार दाखल

■ मुंबई

**राज्य** महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी भोंदू खरात प्रकरणानंतर अब्रुनुकसान झाले, अशी तक्रार करीत न्यायालयात धाव घेतली आहे. त्यांच्या विरोधात करण्यात आलेले आरोप फेटाळत त्यांनी फौजदारी तक्रार दाखल केली आहे. माजी राज्य महिला आयोग सदस्या आशा मिरगे यांच्याविरोधात ही तक्रार दाखल करण्यात आली आहे. माझगाव, मुंबई येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात ही फौजदारी तक्रार नोंदवण्यात आली आहे. आशा मिरगे या राज्य महिला आयोगाच्या माजी सदस्या आहेत. भोंदू प्रकरणातील मुख्य आरोपी अशोक खरात याच्यासोबतचे काही फोटो व्हायरल झाल्यानंतर रुपाली चाकणकर यांच्यावर विविध आरोप करण्यात आले होते. हे सर्व आरोप निराधार असल्याचे सांगत त्यांनी संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. या घडामोडींमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे. चाकणकर यांच्या तक्रारीनंतर या प्रकरणाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# कोहिनूर हिरा भारताला परत द्या न्यूयॉर्कच्या महापौरांचे राजाला आवाहन

■ न्यूयॉर्क

**न्यूयॉर्क** शहराचे महापौर झोहरान ममदानी यांनी आवाहन केले की, ब्रिटनचे राजे किंग चार्ल्स तिसरे यांनी ऐतिहासिक कोहिनूर हिरा भारताला परत द्यावा. किंग चार्ल्स यांच्या अमेरिका दौऱ्यादरम्यान ममदानी यांनी हे वक्तव्य केले.

११ सप्टेंबरच्या दहशतवादी हल्ल्यातील पीडितांच्या स्मरणार्थ आयोजित कार्यक्रमापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत ममदानी म्हणाले की, हा विषय अधिकृत अजेंड्यावर नसला तरी खासगी भेटीची



संधी मिळाल्यास मी हा मुद्दा उपस्थित करीन. मी त्यांना कोहिनूर हिरा भारताला परत देण्याचे आवाहन करतो आहे. ब्रिटिश वसाहत काळात भारतातून नेण्यात आलेल्या व सध्या ब्रिटिश क्राउन ज्वेल्सचा भाग असलेला कोहिनूर हिरा परत करावा ही भारताची दीर्घकालीन मागणी आहे. ममदानी यांच्या वक्तव्यामुळे हा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. बकिंगहॅम पॅलेसने ममदानी यांच्या वक्तव्यावर भाष्य करण्यास नकार दिला, तर महापौर कार्यालयानेही दोघांमधील चर्चेचा तपशील उघड केला नाही.

# हेलिकॉप्टरमधून एकाचवेळी २ क्षेपणास्त्रांची यशस्वी चाचणी

■ नवी दिल्ली

**संरक्षण** संशोधन आणि विकास संघटना (डीआरडीओ) आणि भारतीय नौदल यांनी संयुक्तपणे हेलिकॉप्टरमधून शॉर्ट रेंज नेव्हल अँटी-शिप क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली. बंगालच्या उपसागरात झालेल्या या चाचणीत हेलिकॉप्टरमधून काही सेकंदांच्या अंतराने दोन क्षेपणास्त्रे प्रक्षेपित करण्यात आली. विशेष म्हणजे, एका हेलिकॉप्टरमधून काही सेकंदांच्या अंतराने दोन क्षेपणास्त्रे डागण्यात आली आणि दोन्हींनी लक्ष्य जहाजाच्या खालच्या भागावर अचूक साधले. या चाचणीद्वारे भारताने 'साल्वो लॉन्च' क्षमतेचे यशस्वी प्रदर्शन केले. या तंत्रज्ञानामुळे कमी वेळेत एकाच प्लॅटफॉर्मवरून अनेक क्षेपणास्त्रे डागता येतात, ज्यामुळे शत्रूच्या रडार प्रणालीला चकमा देणे शक्य होते. ओडिशातील चांदीपूर चाचणी केंद्र येथे रडार आणि इतर यंत्रणांच्या मदतीने चाचणी यशस्वीरीत्या पार पडली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या यशाबद्दल डीआरडीओ, नौदल आणि संबंधित सर्वांचे अभिनंदन केले.



# अष्टलक्ष्मी साखर कारखान्यावर कारवाईची मागणी ! शेतकरी चिंतेत

■ मुंबई


**उबाठाचे** खासदार संजय राऊत यांनी नाशिक जिल्ह्यातील उस उत्पादक शेतकऱ्यांच्या एफआरपी थकबाकीचा गंभीर मुद्दा उपस्थित करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले आहे. अष्ट लक्ष्मी शुगर इथेनॉल अँड एनर्जी लिमिटेड, या साखर कारखान्याकडून शेतकऱ्यांना देयके न दिल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

राऊत यांनी पत्रात म्हटले आहे की, सुरुवातीला या कारखान्याचा ताबा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या

## खा. राऊतांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

निकटवर्तीयांकडे होता. त्यानंतर हा कारखाना माजी खासदार हेमंत गोडसे यांच्याकडे देण्यात आला. पुढे त्यांनी तो तिसऱ्या व्यक्तीला चालवण्यासाठी दिला. मात्र, या संपूर्ण प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या हिताकडे पूर्ण दुर्लक्ष झाले. डिसेंबर २०२५ पासून या कारखान्याकडे शेकडो शेतकऱ्यांनी उसाचा पुरवठा केला आहे. उस नियंत्रण कायद्यानुसार उस तोडल्यानंतर १४ दिवसांच्या आत पैसे देणे बंधनकारक असते. मात्र, साडेचार महिने उलटूनही शेतकऱ्यांना अद्याप एकही रुपया मिळालेला नाही. त्यामुळे शेतकरी तीव्र आर्थिक अडचणीत आले असून कर्जाचा बोजा वाढत चालला आहे. शेतकरी आधीच शेती खर्च, मजुरी, कर्जफेड यामुळे त्रस्त आहेत.

# नवाकाळ शब्दकोडे–१५९२



**आडवे शब्द –**

१. डझनावारी विकले जाणारे फळ ३. आतड्याचे शेवटचे टोक ६. विद्येची देवता ९. पार्वती ११. प्रौढी १३. चहाचा पेला १४. मिरवणूक १५. खेद १६. सूर्यमालेचा घटक १७. आर्जवे, दादापुता करणे १९. लोणी २२. पातळ भाजी वाढण्याचे साधन २३. नकलून काढलेला कागद २५. मैत्रीण, आठवण २७. बरोबर केलेले प्रयाण ३०. युद्धबंदीचा करार ३२. दक्षिण भारतातील प्रसिद्ध श्रीमंत देवस्थान ३४. उद्यानंतरचा दिवस ३६. भाऊबीजेची तिथी ३८. उत्तराधिकारी ४१. सगळे ४२. क्रिकेटमधील धाव ४४. निगराणी ४६. रात्रभर झोप न होणे ४८. गांधीजींचे अस्त्र ४९. साताऱ्यातील पुष्प पठार ५०. तांबडा ५१. आश्रय, टेकू ५४. पलीकडे ५६. चैन ५८. सूर्य मावळतो ती दिशा ६०. सैनिकी व्यायाम ६३. सुंदर चेहऱ्याचे काव्यमय वर्णन ६६. काम उरकण्याचा वेग ६७. बलवान ६९. एकूण वय ७०. उत्साहभंग ७२. नवऱ्याची दुसरी बायको ७४. सुंठीचे पूर्वरूप ७६. आंदोलन ७८. दुसऱ्यावर अवलंबून असलेला ८०. कन्या ८२. विभूती ८३. ज्ञाती ८४. उसाचा घट्ट रस ८६. पिवळा कद ८८. शक्तिशाली ९१. धाडसाचे कृत्य ९२. ताकद ९४. कलंक, बट्टा ९६. कायदेविषयक सल्ला देणारा, बाजू मांडणारा ९८. स्वर ९९. स्तुती १००. हिस्सेदार १०१. छाती १०२. अधिक-उणे दाखवून निर्णयास मदत करणारा १०३. गायन १०४. मुद्दा १०५. पोळ्यातून मधाबरोबर मिळणारे उत्पादन

**उभे शब्द –**

१. विष्णूचे एक नाव २. तंगडी ३. फळांचा राजा ४. मर्दुमकी ५. तीव्र, अणकुचीदार उदा. बुद्धी ६. स्त्रियांचा दंडावरील अलंकार ७. श्वासोच्छ्श्वास ८. नेत्र झाकणारा भाग ९. जपणूक १०. शिक्षेला पात्र १२. गूढ १३. लाकूड कापण्याचे साधन १७. निर्विकार १८. अद्दल २०. वसाहत, वास्तव्य २१. आकर्षण, लोभ २३. विरोध, आक्षेप २४. झाड २६. खड्ग २८. प्रणिपात २९. चिन्ह ३१. हातावरील रेषा ३३. ठावठिकाणा ३५. शस्त्राचा घाव ३७. कंबरेचा दागिना ३९. यज्ञातील पवित्र इंधन ४०. नोकरीतील सुट्टी ४१. कुत्रा ४३. असंमती, अस्वीकार ४५. भगवान शंकर ४७. गोरा आणि सावळा यांच्यामधला वर्ण ५१. आरोप ५२. विष्णूची पत्नी ५३. पत्त्यांच्या खेळातील महत्त्वाचे पान ५४. हरिणाचे पिल्लू ५५. भस्म ५७. हातचे सुटलेले, निसटलेले ५९. खुबी ६१. सुगंधी तांदळाची एक जात ६२. तजेलदार ६३. मोकळा ६४. चोच ६५. अंदाजे ६६. कडधान्याचे कालवण ६८. साखर ७१. रचना करणारा ७३. भारताच्या शोधात बाहेर पडल्यावर अमेरिकेचा शोध लागलेला दर्यावर्दी ७५. मूषक ७७. महडचा गणपती-विनायक ७८. पलायन ७९. डुक्कर ८१. वानर ८२. वीट आणणारे ८३. सीता ८५. समान ८७. काफिला ८९. कंजूष, कोत्या मनाचा ९०. राबता, उठबस ९१. कमळ, चक्रवाक पक्षी ९३. मोजदाद ९५. परिमाण ९७. पांढऱ्या पाकळ्यांचा उग्र वासाचा कंद ९९. घाव १०१. आच, उष्णता •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५९१ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. हळकुंड ५. आनन ७. काणा ८. पंख १०. अलंकार ११. भरभराट १२. अंबू १४. बच्चा १५. चाट १६. कच्छ १७. सराईत १९. कुरबूर २०. पत २१. कुळीथ २३. जड २४. विरस २५. दाब २७. कहार २९. गोडी ३०. वाचा ३१. लिंबलोण ३२. खारीक ३३. क्षौर ३५. बांबू ३६. साने ३७. दुसरा ३८. धरबंध ४२. सुत ४४. कार ४६. ठोका ४७. जनावर ४८. मानव ५०. नशीबवान ५२. रवानगी ५४. मदारी ५६. लाट ५८. मका ६०. विसावा ६१. अंबा ६२. रसिक ६४. लागण ६५. रस्सीखेच ६७. टन ६८. गार ६९. लाकूड ७०. शक ७१. दवणा ७२. रस ७३. देवाज्ञा ७४. क्ष ७७. ठोक ७८. वाली ७९. हातोटी ८०. ऊहापोह ८३. फिर्याद ८८. वतनदार ८९. मागाहून ९२. यथातथा ९५. लवकर ९७. कीस ९९. जलद १००. राजीव १०२. पाटव १०५. माघार १०७. घड्याळ १०८. झळ १०९. धूम्रपान ११०. क्षर

**उभे शब्द** : १. बालंट २. हरकत ३. कुंभ ४. डरकाळी ५. आरास ६. नटराज ७. काबू ९. खबरदारी १०. अचानक १२. अंत १३. सरस १८. ईडलिंबू १९. कुरण २०. पर २१. कुडी २२. थवा २४. विलोल २६. बकरा २८. हाकेसरशी २९. गोरज ३२. खानेसुमारी ३४. अंधकार ३५. बांध ३७. दुकानदार ३९. बंधनकारक ४०. सुनामी ४१. भरमसाट ४३. तन ४५. खवाट ४९. वसुबारस ५१. बलाक ५३. वाम ५५. दावानल ५७. दगड ५९. सखेद ६१. अंगारक ६३. सिनीवाली ६४. लाकूडतोड्या ६६. चवळी ७३. देवालय ७५. कपोत ७६. चर्या ८१. हावरट ८२. हनन ८३. फिरकी ८४. दमा ८५. सनदशीर ८६. श्रुत ८७. शिव ९०. गाजर ९१. हूल ९३. थापाड्या ९४. थारा ९५. लव ९६. कपाळ ९८. समा १०१. जीव १०३. वधू १०४. छापा १०६. घाई

# विधानपरिषद आमदारकीसाठी बच्चू कडू शिंदे पक्षात दाखल

पान १ वरून

कडू यांनी सांगितले. कडू यांचा पक्षप्रवेश होण्याच्या काही वेळ आधी प्रसिध्दी माध्यमांनी वारंवार विचारल्यानंतर शिंदे यांनी दुसरा उमेदवार म्हणून नीलम गोऱ्हे यांना संधी देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती दिली. गोऱ्हे यांना उमेदवारी देण्यास पक्षातून विरोध होता. मात्र पक्षप्रमुख या नात्याने एकनाथ शिंदे यांनी पक्षांतर्गत विरोध डावलून गोऱ्हे यांना उमेदवारी दिली.

मविआतील घटक पक्षांकडे मिळून एकच जागा मिळू शकेल एवढे संख्याबळ आहे. ही एकमेव जागा स्वतः उद्धव ठाकरे यांनी लढवावी असा काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा आग्रह होता.मात्र उद्धव ठाकरे पुन्हा विधान परिषदेवर जाण्यास इच्छुक नव्हते. त्यामुळे मविआमध्ये पेच होता. काल दुपारी उबाठाचे नेते आमदार आदित्य ठाकरे यांनी अचानक अंबादास दानवे यांच्या नावाची घोषणा करताच मविआत धुसफूस सुरू झाली. आम्हाला विश्वासात न घेता परस्पर निर्णय का जाहीर केला असा आक्षेप घेत काँग्रेस पक्ष नाराज झाला. दानवेंच्या उमेदवारीला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि विजय वडेट्टीवार यांनी उघड विरोध करत काँग्रेस उमेदवार उभा करील, अशी भूमिका घेतली होती. त्यामुळे मविआमध्ये उबाठा आणि काँग्रेस यांच्यात धुसफूस सुरू झाली.

गांधी भवनवर काँग्रेस नेत्यांची बैठक बोलावण्यात आली. ही बैठक सुरू असताना उबाठाचे अनिल परब, अनिल देसाई आणि स्वतः अंबादास दानवे काँग्रेसची मनधरणी करण्यासाठी गांधी भवनवर गेले. तिथे बराच वेळ खलबते केल्यानंतर अखेर मविआतील तिढा मिटला. दोन वर्षांनंतर होणार असलेल्या राज्यसभेच्या आणि विधान परिषदेच्या जागेसाठी काँग्रेसलाच प्राधान्य दिले जावे, अशा अटीवर काँग्रेसने विधान परिषद निवडणुकीतून माघार घेतली. त्यानंतर मविआच्या वतीने घेण्यात आलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत सपकाळ यांनी दानवे हेच मविआचे उमेदवार असतील आणि काँग्रेसचा त्यांना पाठिंबा असेल, अशी घोषणा केली.

## लढाईचे हेच फळ मिळाले अमोल मिटकरींची पोस्ट

राष्ट्रवादी अजित पवार गटातून झिशान सिद्दिकी यांच्या नावाची घोषणा होताच अमोल मिटकरी यांनी एक्स सोशल मीडियावर भावनिक पोस्ट करत नाराजी व्यक्त केली. माझ्या लढाईचे हेच फळ मिळेल, ही मानसिक तयारी मी २९ जानेवारीलाच केली होती . दादा...हरकत नाही...दादा तुमच्यासाठी एक संधी काय अशा हजार संधी हा अमोल मिटकरी ओवाळून टाकेल. तुमची लढाई मी कालही लढत होतो,आजही लढत आहे आणि उद्याही लढत राहीन. या लढाईत कोणी सोबत असो अथवा नसो न्याय मिळेपर्यंत ही लढाई थांबवणार नाही. तीच तुम्हाला खरी श्रद्धांजली ठरेल. अपघातामागचे सत्य जगासमोर येईपर्यंत मी शांत बसणार नाही. वेळ पडल्यास याहीपेक्षा मोठी किंमत चुकवेन, असे मिटकरी यांनी पोस्टमध्ये लिहिले. मुझे मिटाने की इतनी भी जल्दी क्या थी , थोडा वक्त देते, मै खुद ही राख बन जाता.. दादा मिस यू ,असे म्हणत शेवटी मिटकरी यांनी पक्षांतर्गत विरोधकांना भावनिक संदेश दिला.

## नीलम गोऱ्हे यांचा राजकीय प्रवास

डॉ.नीलम गोऱ्हे यांनी राजकीय कारकीर्दीच्या सुरुवातीला प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारिपमध्ये प्रवेश केला आणि त्या पक्षाच्या तिकिटावर विधानसभेची निवडणूकही लढवली. त्यानंतर त्यांनी काही काळ शरद पवार यांच्यासोबत काम केले. मग त्या रामदास आठवलेंच्या रिपब्लिकन पक्षात गेल्या. यानंतर २२ फेब्रुवारी १९९८ रोजी त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. २००५ मध्ये त्या शिवसेनेच्या उपनेत्या झाल्या, २००७ मध्ये प्रवक्त्या आणि २०१० मध्ये पुणे जिल्हा संपर्कप्रमुख म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. २०१६ ते २०१८ दरम्यान त्यांनी सिनेट सदस्य म्हणून काम पाहिले. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात २४ जून २०१९ रोजी त्यांची महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापतीपदी बिनविरोध निवड झाली. सप्टेंबर २०२० मध्ये त्या पुन्हा विधानपरिषदेवर गेल्या आणि या पदावर कायम राहिल्या. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्य म्हणून त्यांनी चार वेळा काम केले आहे. शिवसेना फुटीनंतर ७ जुलै २०२३ रोजी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या गटाला सोडून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिंदे गटात प्रवेश केला. आता या पक्षातून त्यांना पुन्हा विधानपरिषद सदस्यत्व मिळणार आहे.

# पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण वाढवण्यासाठी नियमांत बदल

पान १ वरून

ई१०० (शंभर टक्के इथेनॉल), त्याचबरोबर बी१०० (बायो डिझेल) आणि हायड्रोजन-सीएनजी मिश्र इंधन आदि पर्यायी इंधनांच्या वापरास मान्यता दिली जाणार आहे.

देशाच्या इंधन गरजेपैकी सुमारे ८५ टक्के कच्चे तेल परदेशांतून आयात केले जाते. त्यापोटी सरकारला दरवर्षी मोठ्या प्रमाणात परकीय चलन खर्च करावे लागते. त्याचबरोबर पेट्रोलच्या ज्वलनामधुन हवेत मोठ्या प्रमाणात कार्बन मोनोक्साईड मिसळतो. हवेचे हे प्रदूषण कमी करण्यासाठी आणि तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याच्या उद्देशाने मोटर वाहन विषयक नियमांमध्ये बदल करण्याची अधिसूचना २७ एप्रिल रोजी जारी केली आहे. त्यावर सर्व संबंधित घटकांकडून हरकती आणि सूचना मागवण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी राखून ठेवण्यात आला आहे. त्यानंतर मोटर वाहन नियमांत बदल करण्याचा हा प्रस्ताव मार्गी लावण्यात येणार आहे.


## बृहन्मुंबई महानगरपालिका

### ई-निविदा सूचना

| | |
|---|---|
| निविदा प्रपत्र क्र. | बोली क्र. २०२६_बृमुंमपा_१२९८७३६_१ |
| संस्थेचे नाव | टीबी रुग्णालये, शिवडीचा गट |
| विषय | जीटीबी रुग्णालये, शिवडी येथे एमडीआय फोर्मोटेरोल ६ एमसीजी + बुडेसोनाईड २०० एमसीजीचे प्रापण. |
| निविदेची किंमत | ८००/- + (१८.०% जीएसटी) |
| ई-निविदेची किंमत (अंदाजित किंमत) | बाब दर निविदा |
| ईएमडी | रु. ६६२०.०० |
| निविदा पारित आणि विक्री करण्याचा दिनांक | दि. ३०.०४.२०२६ रोजी १५.०० वा.पासून |
| निविदा विक्रीकरिता आणि बोली सुरक्षा अनामत स्वीकारण्याचा अंतिम दिनांक आणि वेळ | दि. ०९.०५.२०२६ रोजी १७.०० वा. |
| पाकीट अ आणि पाकीट ब उघडणे | दि. ११.०५.२०२६ रोजी १२.०० नंतर |
| संपर्काचा पत्ता | वैद्यकीय अधीक्षक यांचे कार्यालय, जीटीबी रुग्णालय, जेरबाई वाडिया मार्ग, शिवडी, मुंबई - ४०००१५. |
| बोली उघडण्याचे ठिकाण | वैद्यकीय अधीक्षक यांच्या कार्यालयात ऑनलाईन |

सही/-
पीआरओ/२१४/जाही./२०२६-२७ वैद्यकीय अधीक्षक, जीटीबीएच

जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते



**सार्वजनिक सूचना**

सर्व संबंधितांना व जनतेस सूचित करण्यात येते की, माझी अशील श्रीमती. कल्पना रमेश मत्रे राहणार – रूम नं. एच-२१, संतोष नगर, दिंडोशी, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३ या सदर रूमच्या कायदेशीर धारक, ताबेदार आहेत.
सदर रूम ही त्यांचे पती स्व. श्री. रमेश विठ्ठल मत्रे यांच्या नावावर होती व त्यांच्या निधनानंतर सदर रूमवर कायदेशीर हक्क हा केवळ श्रीमती कल्पना रमेश मत्रे यांचाच आहे. तसेच, हे स्पष्ट करण्यात येते की श्री. संजय विठ्ठल मत्रे व श्रीमती अर्चना संजय मत्रे यांना सदर रूममध्ये फक्त तात्पुरत्या स्वरूपात राहण्याची परवानगी देण्यात आली होती. त्यांना सदर रूमबाबत कोणताही मालकी हक्क, भाडेकरार हक्क किंवा अन्य कायदेशीर अधिकार देण्यात आलेला नाही. त्यांनी कथितपणे बनावट कागदपत्रांच्या आधारे वीज जोडणीचे बेकायदेशीर हस्तांतरण करून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे, ज्याबाबत संबंधित प्राधिकरणाकडे तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.
म्हणून, सर्वसामान्य जनतेस व संबंधितांना यानिमित्ताने जाहीर सूचना देण्यात येते की सदर रूम नं. एच-२१, संतोष नगर, दिंडोशी, गोरेगाव (पूर्व), मुंबई या मालमत्तेबाबत कोणतीही खरेदी-विक्री, भाडे व्यवहार, ताबा व्यवहार, करार किंवा कोणतेही आर्थिक व्यवहार करू नयेत.कोणीही व्यक्ती वरील नमूद व्यक्तींशी व्यवहार केल्यास तो स्वतःच्या जोखमीवर करेल आणि त्याबाबत माझी अशील जबाबदार राहणार नाही.
सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करण्यापूर्वी माझ्या अशीलची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. ही सूचना जनहितार्थ व भविष्यातील वाद टाळण्यासाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.
ठिकाण : मुंबई दिनांक : ०१/०५/२०२६
**विकास दिनकर शिंदे** (वकील उच्च न्यायालय)
फ्लॅट क्र. १०, तळमजला,एकदंत सह. गृह. संस्था मर्या., संभाजी नगर, सहार रोड,अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०६९



**सार्वजनिक सूचना**

माझी अशील श्रीमती कल्पना रमेश मत्रे, पत्ता - रूम नं. एच-२१, संतोष नगर, दिंडोशी, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३ यांच्या वतीने सर्व संबंधितांना व सर्वसामान्य जनतेस पुढीलप्रमाणे सूचित करण्यात येते:
माझ्या अशिलांनी फ्लॅट क्र. ४०१, श्रेयस एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सी.टी.एस. क्र. ४४८, ४४८/१ ते ५६, गाव पहाडी, आरे रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३ (यापुढे "सदर फ्लॅट" असे संबोधण्यात येईल) हा फ्लॅट श्रीमती अनिता अनंत बेलोसे यांच्याकडून खरेदी करण्यासाठी व्यवहार केलेला आहे.
माझ्या अशिलांनी सदर व्यवहारासाठी दिनांक ०१/११/२०२३ रोजीच्या मेमोरेंडम ऑफ अंडरस्टँडिंगनुसार व त्याआधीच्या व्यवहारांनुसार एकूण रु. ४२,००,०००/- (रुपये बेचाळीस लाख फक्त) इतकी रक्कम अदा केलेली आहे. सदर रक्कम प्राप्त झाल्यानंतरही श्रीमती अनिता अनंत बेलोसे यांनी विक्री करार नोंदणी करण्यास टाळाटाळ केली असून त्यांनी बेकायदेशीररीत्या अतिरिक्त रकमेची मागणी केली आहे व व्यवहार पूर्ण करण्यास जाणीवपूर्वक विलंब करीत आहेत.
यासंदर्भात माझ्या अशील व सदर श्रीमती अनिता अनंत बेलोसे यांच्यामध्ये गंभीर वाद निर्माण झाले असून, सदर फ्लॅट बाबत योग्य त्या कायदेशीर कारवाया, तसेच फौजदारी तक्रारी दाखल करण्यात येत आहेत. म्हणून सर्वसामान्य जनता, बँका, वित्तीय संस्था, विकासक व इतर सर्व संबंधितांना याबाबत कडक इशारा देण्यात येतो की, त्यांनी सदर फ्लॅट बाबत कोणताही व्यवहार, करार, विक्री, हस्तांतरण, गहाण, भाडेपट्टा किंवा कोणतेही तृतीय पक्ष हक्क निर्माण करू नयेत. सदर फ्लॅट संदर्भात कोणतीही व्यक्ती व्यवहार करीत असल्यास तो व्यवहार पूर्णपणे स्वतःच्या जबाबदारीवर व जोखमीवर असेल व माझी अशील अशा कोणत्याही व्यवहारास बांधील राहणार नाही.
सदर फ्लॅट बाबत कोणताही व्यवहार करण्यापूर्वी माझ्या अशिलांची लेखी पूर्वसंमती घेणे आवश्यक आहे, अन्यथा असा व्यवहार बेकायदेशीर व अमान्य समजला जाईल.
ही सूचना माझ्या अशिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी व भविष्यातील वाद टाळण्यासाठी जाहीर करण्यात येत आहे.
ठिकाण : मुंबई दिनांक : ०१/०५/२०२६
**विकास दिनकर शिंदे** (वकील उच्च न्यायालय)
फ्लॅट क्र. १०, तळमजला,एकदंत सह. गृह. संस्था मर्या., संभाजी नगर, सहार रोड,अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०६९



**SBI**
भारतीय स्टेट बँक
प्रादेशिक व्यवसाय कार्यालय, फोर्ट,
1ला मजला, अटलांटा इमारत, जमनालाल बजाज रोड, नरिमन पॉइंट – 400021

**व्यावसायिक / कार्यालयीन वास्तूची आवश्यकता**

भारतीय स्टेट बँक व्यावसायिक / कार्यालयीन वास्तूच्या मालकांकडून / मुखत्यारपत्रधारकांकडून भाडेपट्टा तत्त्वावर मुंबईमधील डॉकयार्ड रेल्वे स्थानकाजवळील व भायखळा स्थानकाजवळील शाखेसाठी प्रस्ताव मागवित आहे. अधिक तपशिलांसाठी आणि मुंबईच्या माझगाव सर्कल शाखेची निविदा पत्रिका डाऊनलोड करण्यासाठी, कृपया **03.05.2026** ते **08.05.2026** दरम्यान एसबीआय वेबसाईटला **@https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/procurement-news** येथे भेट द्या. या कार्यालयात प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ **08.05.2026** रोजी **दुपारी 3:30** पर्यंत असेल. या संदर्भातील पुढील **सूचना / स्पष्टीकरण** केवळ बँकेच्या उपरोक्त वेबसाईटवरच प्रकाशित होईल.
**कृपया मध्यस्थांनी अर्ज करू नये.**
सहायक महाव्यवस्थापक
आरबीओ फोर्ट



## गोमंतक दैवज्ञ ब्राह्मण समाज, मुंबई (शिक्षण फंड)

### तातडीची सभा

गोमंतक दैवज्ञ ब्राह्मण समाज, मुंबई (शिक्षण फंड) संस्थेच्या सभासदांची तातडीची सर्वसाधारण सभा, रविवार दि. १७ मे २०२६ रोजी सायं. ५-३० वाजता चौगुले हायस्कूल हॉल, श्रीकृष्णनगर, बोरीवली (पूर्व) मुंबई येथे संस्थेचे प्रवर्तक श्री. अनिल रामनाथ कारेकर यांच्या अध्यक्षतेखाली खालील कामकाजावर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी बोलाविण्यात आली आहे. कृपया सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,
सही/-
अनिल रामनाथ कारेकर
मुख्य प्रवर्तक

दिनांक :
मुंबई

**सभेपुढील कामकाज :**
१) निमंत्रण पत्रिकेचे वाचन करणे.
२) विश्वस्त व कार्यकारिणीची निवड करणे.
३) अध्यक्षांच्या परवानगीने येणारी इतर कामे.

**टीप :** गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास हीच सभा सुमारे अर्धा तासाने ह्याच ठिकाणी पुन्हा बोलाविण्यात येईल. सदर सभेस गणसंख्येची आवश्यकता भासणार नाही.



**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**

- उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) अन्वये सूचनेसह कलम १५४ अन्वये निदेश.
- वांद्रे-कुर्ला संकुल अधिसूचित क्षेत्रासाठीच्या विकास नियंत्रण नियमावलीचे विनियम ४ (ii) मधील खंड (A) मधील प्रस्तावित फेरबदलाबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई :४०० ०३२,**
**दिनांक :- २०/०४/२०२६**

**सूचना**

**क्र. टिपीबी-**४३२३/**प्र.क्र.**१३९/२०२३/**नवि-**११

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ०७ मार्च, १९७७ रोजीच्या अधिसूचना क्र. बीकेआर - १९७७/२६२/युडी-५ अन्वये वांद्रे-कुर्ला संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी (ज्याचा उल्लेख यापुढे वांद्रे-कुर्ला संकुल असा केला आहे) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अनुसार स्थापन झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण (ज्याचा उल्लेख यापुढे प्राधिकरण असा केला आहे) म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (ज्याचा उल्लेख यापुढे ''उक्त अधिनियम'' असा केला आहे) च्या कलम ४०, पोट कलम (१) (क) अन्वये नियुक्ती केली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ०९ एप्रिल, १९७९ रोजीच्या अधिसूचना क्र. बीकेआर - १९७७/२६२/युडी-५ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ४०, पोट कलम, (३) खंड (डी) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून वांद्रे-कुर्ला संकुलासाठी प्राधिकरणाने सादर केलेल्या नियोजन प्रस्तावास तसेच सदर क्षेत्रासाठी लागू करावयाच्या विकास नियंत्रण नियमावली, १९७९ यांस मान्यता दिली आहे (ज्याचा उल्लेख यापुढे ''उक्त नियमावली'' असा केला आहे);

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभागाच्या दिनांक ०२ मे, २००८ रोजीच्या अधिसूचना क्र. टीपीबी - ४३०७/२५९४/प्र.क्र.-६५/२००८ /नवि-११ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ३७, पोट कलम, (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून वांद्रे-कुर्ला संकुलातील 'जी (जी, जीएन व जी-टेक्स्ट) ब्लॉकचा चटई क्षेत्र निर्देशांक वाणिज्य वापरासाठी २.० ते ४.० पर्यंत व रहिवास वापरासाठी १.५० ते ३.० पर्यंत वाढविण्याच्या अनुषंगाने उक्त नियमावलीच्या विनियम क्र. ४ (ii) मध्ये सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभागाच्या दिनांक ३१ ऑगस्ट २००८ रोजीच्या अधिसूचना क्र. टीपीबी-४३०८/२६१७/प्र.क्र.- २९/२००९/नवि-११ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ३७, पोट कलम (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून वांद्रे-कुर्ला संकुलातील 'ई' ब्लॉकचा चटई क्षेत्र निर्देशांक (सीआरझेड क्षेत्र वगळून) वाणिज्य वापरासाठी २.० ते ४.० पर्यंत व रहिवास वापरासाठी १.५० ते ३.० पर्यंत वाढविण्याच्या अनुषंगाने उक्त नियमावलीच्या विनियम क्र. ४ (ii) मध्ये सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभागाच्या दिनांक २३ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या अधिसूचना क्र. टीपीबी - ४३१३/२४४/प्र.क्र.-१५८/१३/नवि-११ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ३७, पोट कलम, (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून वांद्रे-कुर्ला संकुलातील 'जी' ब्लॉकमधील रहिवास वापरासाठी चटई क्षेत्र निर्देशांक ३.० ते ४.० पर्यंत वाढविण्याच्या अनुषंगाने उक्त नियमावलीच्या विनियम क्र. ४ (ii) मध्ये सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे:

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीच्या विनियम क्र. ४ (ii) अन्वये वांद्रे-कुर्ला संकुलातील चटई क्षेत्र निर्देशांक (Aggregate FSI) हा संबंधित जमीन वापराच्या एकूण विकासयोग्य क्षेत्रासाठी लागू असून निव्वळ भूखंडावरील कमाल चटई क्षेत्र निर्देशांक हा प्राधिकरणाच्या वास्तुशास्त्रीय नियंत्रणानुसार लागू राहील असे नमूद केले आहे :

आणि ज्याअर्थी, शासन नगर विकास विभागाच्या दिनांक २९ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या शासन निर्णय क्र.एमआरडी-३३२२/प्र.क्र.८३ /नवि-७ अन्वये वांद्रे-कुर्ला संकुलातील प्राधिकरणाच्या भूखंडावर अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक अधिमुल्याचे उचित सुसूत्रीकरण करण्याकरिता अभ्यास करण्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव, नगर विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती गठीत केली आहे;

आणि ज्याअर्थी, सदर उच्चस्तरीय समितीने दि. २३ नोव्हेंबर, २०२२, दि. १२ जानेवारी, २०२३ व दि. १२ मे,२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये वांद्रे-कुर्ला संकुलातील प्राधिकरणाच्या भूखंडावरील अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक वाटपाबाबतच्या विविध मुद्द्यांवर चर्चा करून समितीचा अहवाल महाराष्ट्र शासनास दि. १० जुलै, २०२३ रोजी सादर केला आहे ज्यामध्ये समितीने वांद्रे-कुर्ला संकुलातील उक्त ब्लॉकमधील बहुतांश भूखंडाचे वाटप झाले असल्याने उर्वरित भूखंडावर शिल्लक बांधकाम क्षेत्र वापरण्यासाठी व अस्तित्वातील इमारतींवर तसेच इमारतींच्या पुनर्विकासासाठी / पुनर्बांधणीसाठी अतिरिक्त बांधकाम क्षेत्र उपलब्ध करून उक्त ब्लॉकमधील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्र (International Finance and Business Centre) /वित्तीय व्यापार क्षेत्र (Financial Business Area) चा जलदगतीने विकास करण्याच्या अनुषंगाने उक्त ब्लॉकचे एकत्रीकरण करुन संपूर्ण क्षेत्रावर (Gross plot Area ) '४.०' ग्लोबल चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करून याद्वारे उपलब्ध होणाऱ्या अतिरीक्त बांधकाम क्षेत्राच्या वाटपासाठी प्रोत्साहनात्मक दर लागू करण्याची शिफारस केली आहे;

आणि ज्याअर्थी, सदर उच्चस्तरीय समितीच्या शिफारशी विचारात घेऊन, वांद्रे-कुर्ला संकुलातील उक्त ब्लॉकमधील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्राचा जलदगतीने विकास होऊन जास्तीत जास्त कार्यालये, निवासी सदनिका व इतर सोयी सुविधा यांच्या मार्फत रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी तसेच वांद्रे-कुर्ला संकुल व बृहन्मुंबई महापालिकेतील इतर क्षेत्रांमधील विकासांमध्ये समानता राहण्याच्या दृष्टीकोनातून उक्त नियमावलीमध्ये फ़ेरबदल करण्यात आला असून, सदर फ़ेबदलास शासन नगर विकास विभागाकडील दि.१९/०७/२०२४ रोजीचे अधिसूचनेद्वारे मंजूरी देण्यात आली आहे (ज्याचा उल्लेख यापुढे ''उक्त अधिसूचना'' असा केला आहे);

आणि ज्याअर्थी, प्रमुख, टाऊन अ‍ॅण्ड कंन्ट्री प्लानिंग डिव्हिजन, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांचेकडील दिनांक २३/०५/२०२५ रोजीचे पत्र शासन नगर विकास विभागास प्राप्त झाले असून, सदर पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, "CREDAI-MCHI" यांनी दिनांक ३०/०१/२०२५ रोजीचे तसेच BKC Property Owners Association यांनी दिनांक २३/०४/२०२५ रोजीचे एमएमआरडीए ला सादर केलेल्या पत्रांद्वारे राज्य शासनाच्या दिनांक १९/०७/२०२४ च्या अधिसूचनेनुसार बीकेसी येथे अनुज्ञेय असलेल्या अतिरिक्त बांधकाम क्षेत्राच्या वापरासाठी आवश्यक असलेल्या पार्किंगचे प्रमाणात ५०% सवलत देण्याबाबत विनंती केली आहे. यासंदर्भात, एमएमआरडीएचे मत असे आहे की, बीकेसीमधील भाडेकरू/मालमत्ता धारकांना भेडसावणाऱ्या अडी-अडचणी तसेच "CREDAI-MCHI" यांचे दिनांक ३०/०१/२०२५ रोजीच्या पत्रामध्ये व BKC Property Owners Association यांचेकडील दिनांक २३/०४/२०२५ रोजीच्या वर नमूद पत्रांमध्ये नमूद केलेले विविध मुद्दे विचारात घेणे आवश्यक असून, बीकेसीमधील अतिरिक्त बांधकाम क्षेत्राच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी याचा विचार करणे आवश्यक आहे.'' असे नमूद केले असून, पार्किंग सवलती संदर्भातील वरील विनंतीबाबत शासनाने योग्य ते निर्देश देणेबाबत, एमएमआरडीएने विनंती केली आहे;

आणि ज्याअर्थी, वर नमूद वस्तुस्थिती व एमएमआरडीएची विनंती विचारात घेता, उक्त अधिसूचना दि.१९/०७/२०२४ नुसार अनुज्ञेय असलेल्या अतिरिक्त बांधकाम क्षेत्राचा वापर शक्य होण्याच्या दृष्टीने, त्यानुषंगाने सार्वजनिक हिताचे दृष्टिने उक्त नियमावलीचे विनियम ४ (ii) मधील खंड (A) मध्ये नवीन तरतूद अंतर्भूत करण्यासाठी सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये दर्शविल्यानुसार उक्त नियमावलीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, असे शासन नगर विकास विभागाचे मत झाले आहे (ज्याचा उल्लेख यापुढे ''प्रस्तावित फ़ेरबदल'' असा केला आहे);

आणि त्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती आणि वस्तुस्थिती विचारात घेता आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट कलम (१कक) अन्वये प्राप्त अधिकार आणि त्या संदर्भातील सर्व शक्तींचा वापर करुन, शासन याद्वारे प्रस्तावित फेरबदलाविषयी उक्त अधिनियमाच्या कलम ३७, पोट कलम (१कक) चे खंड (क) नुसार कोणत्याही व्यक्तीकडून हरकती/सूचना मागविण्यासाठी तसेच संभाव्य बाधित होणाऱ्या व्यक्तींच्या माहितीसाठी सदर सूचना प्रसिध्द करीत आहे. शासनाकडून असेही कळविणेत येत आहे की, खालील परिशिष्टात नमूद प्रस्तावित फेरबदलाविषयी कोणत्याही हरकती/ सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात सदर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांचेकडे इन्सा हटमेंटस, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४००००१ या कार्यालयाचे पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. सदर प्राप्त हरकती / सूचनांवर सुनावणी देवून तसेच लागू असेल त्याप्रमाणे उक्त महानगरपालिकेचे म्हणणे घेवून त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना शासनाचे वतीने अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत असून त्यांच्याकडे सदरच्या कालावधीत प्राप्त होणाऱ्या हरकती / सूचना यावर उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट कलम (१कक) अन्वये कार्यवाही करण्यात येईल;

शासन याद्वारे उक्त अधिनियमाचे कलम १५४ (१) अन्वये एमएमआरडीला निर्देश देत आहे की, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) चे उपकलम (ग) अन्वये प्रस्तावित फेरबदलास शासन मान्यता प्रलंबित असेपर्यंत प्रस्तावित फेरबदल लगोलग अंमलात येईल.

उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) अन्वये सदर फेरबदलाची सूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदा/नियम) या वेबसाईटवर देखील प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
**(अमर पाटील)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**परिशिष्ट**

**( शासन नगर विकास विभाग सूचना क्र. टिपीबी- ४३२३/प्र.क्र.१३९/२०२३ /नवि-११, दिनांक- २०/०४/२०२६ सोबतचे परिशिष्ट)**

**New Note (iv) is proposed to be inserted under Clause (A) of Regulation 4 (ii) of BKC Notified Area Development Control Regulations as follows:-**

In case additional construction is proposed in the previously developed / under construction buildings in 'E' and 'G' blocks as per additional Built-Up area permissible under this regulation wherein clearly demonstrable hardship is caused in proposing parking area as per the provisions of the Development Control and Promotion Regulations for such additional built-up area, then in such cases, with prior approval of Government, the Metropolitan Commissioner, MMRDA is empowered to grant upto 50% relaxation in the required parking to be provided for such additional built-up area only. Provided that, in any circumstances, the parking area shown while approving the plans before coming into force of notification dated 24/07/2024 shall not be reduced.

क्र.: आरओसी/२०२६-२७/क्र.५/सी ५५२

सही/-
**(अमर पाटील)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

# नवाकाळ

• मुंबई | शुक्रवार १ मे, २०२६ • पान -८




# दुष्काळाचा सामना करण्यासाठी सज्ज राहा! फडणवीसांच्या सूचना

■ मुंबई

**राज्यात** मान्सून उशिरा दाखल होण्याची शक्यता वर्तवण्यात येत असून दुष्काळाची परिस्थिती निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

'एल निनो'च्या प्रभावामुळे यंदा मान्सूनचे आगमन जूनच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत लांबण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मे आणि जून महिन्यात उष्णतेच्या लाटा वाढण्याचा अंदाज असून मराठवाडा आणि विदर्भात तीव्र दुष्काळाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्येही पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता आहे. राज्यातील धरणांमध्ये सध्या सरासरी सुमारे ४० टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मात्र वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनाचा वेग वाढल्याने जलसाठ्यात झपाट्याने घट होत आहे. गेल्या वर्षीही एप्रिल अखेरीस अशीच स्थिती होती. उष्णतेमुळे पाण्याची मागणी वाढली असून अनेक लहान धरणे तळ गाठण्याच्या स्थितीत आहेत. मुंबईतही पाणीटंचाईचा धोका निर्माण झाला आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या ७ धरणांमध्ये केवळ २८.३५ टक्के साठा शिल्लक आहे.


WE ARE HIRING! JOIN OUR TEAM

Required Candidates for Reputed Industries
Pharma (API)/ Chemical/Oil & Gas/
Construction & Engineering Companies
For Ambernath / Khopoli / Mahad / Kalyan

BLUE JET HEALTHCARE

| Sr.No. | Position | Qualification | CTC |
|---|---|---|---|
| 1. | Plant Operators | ITI AOCP/12th Science / B.Sc. | 2 to 5 lacs |
| 2. | Production Officer/ Production Sr. Officer | M.Sc./B.Sc./B.E./Dip.Chemical Engg. | 3 to 5 lacs |
| 3. | Shift Incharge - Production | B.E. Chemical | 5 to 7 lacs |
| 4. | Officer Executive (R&D Synthesis) | M.Sc. Organic Chemistry/B.Sc. | 3 to 5 lacs |
| 5. | Maintenance Engineer | B.E. Mechanical/ Electrical Engg. | 4 to 8 lacs |
| 6. | EHS Manager / Safety Executive | M.Sc./B.Sc./Chem Engg./ADIS | 5 to 10 lacs |
| 7. | Purchase Engineer (Capex/Engg. Materials) | B.E. Engineer | 5 to 6 lacs |
| 8. | Asst. Manager / Manager - HR | Graduate with MBA HR | 12 to 20 lacs |
| 9. | Security Manager / Incharge | Any Graduate / Ex-Servicemen | 10 to15 lacs |
| 10. | Sales & Marketing Manager (Construction) | Graduate | 12 to 15 lacs |
| 11. | Machine Operator | S.S.C / H.S.C./Any ITI | 17K to 27K |
| 12. | Helper (Required 300 Nos.) | 15,000 for 8 hrs & 27,000 for 12 hrs | |

More then 100 Vacancies

WALK-IN- INTERVIEW WITH DIRECT HR
Any ITI/Bsc & Chemical Engineer
Fresher Can Also Apply

Date: Friday, 01.05.2026, Timing 10 to 5
Venue : ABC Lines Manpower Consultant Office No. 115, 1st Floor, Sawant Arcade, Opp. ISHA Netralay Bank, Shiv Mandir Road, Near Station, Ambernath - East, Dist. Thane.
Call :- 9321333933 / 9225333733

Date: Sunday, 03.05.2026, Timing 10 to 4
Venue : Samarth Green House,Shree Samarth Mangal Karyalay, Khopoli Pune Mumbai Highway, Near Samarth Krupa Hotel, Opp. SK Wheel Showroom, Khalapur, Khopoli.
Call :- 9833373395 / 9323049211

Interested Candidates send CV on Email : abcjobs33@gmail.com


## मध्य रेल्वे विस्कळीत
### लोकल २५ मिनिटे उशिराने

**मुंबई** - मध्य रेल्वेच्या उपनगरीय सेवा आज सकाळी विस्कळीत झाली. लांब पल्ल्याच्या गाड्यांना प्राधान्य दिल्यामुळे कर्जतहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जाणाऱ्या लोकल गाड्या उशिराने धावत होत्या. सीएसएमटीकडे धावणाऱ्या जलद लोकल २५ मिनिटे उशिराने धावत होत्या, तर धिम्या लोकल १० ते १५ मिनिटे उशिराने धावत असल्याने स्थानकांवर प्रवाशांची गर्दी झाली.





